बुधवार, २१ डिसेंबर २०२२

⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१२५

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 21 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-125 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-08 ● PRICE-5


# ‘लव्ह जिहाद’बाबत महाराष्ट्रातही कायदा होणार

## श्रद्धा वालकर प्रकरणाचा उल्लेख करत देवेंद्र फडणवीसांचे मोठे विधान

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : ‘लव्ह जिहाद’बाबत कायदा करण्याची मागणी महाराष्ट्रात जोर धरू लागली आहे. राज्य सरकारकडूनही त्यासंदर्भात काही प्रसंगी भूमिका मांडण्यात आली आहे. मात्र, आज विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठे विधान केले आहे. यासंदर्भात भाजपा आमदार अतुल भातखळकर यांनी मांडलेल्या मुद्द्यांना उत्तर देताना देवेंद्र फडणवीसांनी त्यावर स्पष्टीकरण दिले की, महाराष्ट्रात लव्ह जिहादबाबत कायदा करण्याची राज्य सरकारची मानसिकता असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

अतुल भातखळकर यांनी लव्ह जिहादच्या मुद्द्यावर भूमिका मांडताना श्रद्धा वालकर प्रकरणाचा उल्लेख केला. श्रद्धा वालकर प्रकरणासारख्या अनेक घटना महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांत समोर आल्या आहेत. त्यामुळे लव्ह जिहादला विरोध करणारा एखादा कायदा करण्याचा राज्य सरकार विचार करत आहे का? असा सवाल अतुल भातखळकर यांनी उपस्थित केला. तसेच, श्रद्धा वालकरने २०२०मध्ये तक्रार अर्ज केल्यानंतरही पोलिसांनी त्यावर कार्यवाही न करण्यामागे तत्कालीन सरकारच्या शीर्षस्थ नेत्यांचा राजकीय दबाव होता का? असाही सवाल भातखळकरांनी उपस्थित केला.

दरम्यान, यासंदर्भात उत्तर देताना फडणवीसांनी या प्रकरणात राजकीय दबाव असल्याचे समोर आले नसल्याचे स्पष्ट केले. आत्तापर्यंतच्या तपासात या प्रकरणात कोणत्या राजकीय किंवा बाहेरच्या व्यक्तीचा दबाव आढळून आलेला नाही. मात्र, तिने तक्रार परत का घेतली? याची चौकशी आपण करत आहोत. त्याचसोबत तिने तक्रार करणे आणि ती परत घेणे यात एका महिन्याचा कालावधी गेला. २३ तारखेला तिने तक्रार केली आणि पुढच्या महिन्याच्या १९ तारखेला तक्रार परत घेतली. यादरम्यान पोलिसांनी काय कारवाई केली? तेव्हा जर तपास केला असता, तर हा प्रकार टाळता आला असता. त्याचे चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. आपण याची माहिती घेत आहोत की इतके दिवस त्यांनी कारवाई का केली नाही? असे फडणवीस म्हणाले. यावर पुढचा उपाय म्हणून आपण सांगितले की अशा परिस्थितीत एखाद्या महिलेची तक्रार आल्यावर पोलिसांनी त्यावर तात्काळ कारवाई केली पाहिजे. किमान तिला बोलवून तिचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात ४० मोठे मोर्चे निघाले. यात लव्ह जिहादबाबत कठोर कायदा करण्यात यावा. इंटरफेथ मॅरेजला सरकारचा कोणताही विरोध नाही. मात्र, गेल्या काही काळात जाणीवपूर्वक षडयंत्राचा भाग म्हणून काही जिल्ह्यांमध्ये असे विवाह केले जात आहेत. वर्ष-दीड वर्षात त्या मुलीला त्रास दिला जातो. अशा घटना मोठ्या प्रमाणावर बाहेर येताना दिसत आहेत, असे देवेंद्र फडणवीसांनी यावेळी नमूद केले.



**लव्ह जिहाद हा शब्द केरळ सरकारने दिला :** काही राज्यांनी लव्ह जिहादच्या बाबत कायदे केले आहेत. मी जाणीवपूर्वक सभागृहाला सांगतो, की लव्ह जिहाद हा विषय सर्वात आधी केरळमध्ये बाहेर आला. हे नाव केरळच्या सरकारने त्याला दिले आहे. हे कुठल्या धर्माच्या विरोधात कार्यवाही आहे असे नाही. पण अशा घटना घडतायत. म्हणून वेगवेगळ्या राज्यांनी याबाबत जी भूमिका किंवा कायदे केले आहेत, त्यांचा अभ्यास करून आपल्याकडे यासंदर्भात प्रभावी कायदा करण्याची गरज असेल, तर तो करण्याची राज्य सरकारची मानसिकता आहे. षडयंत्राचा भाग म्हणून कोणत्याही महिलेची फसवणूक होऊ नये, अशी राज्य सरकारची भूमिका आहे. आवश्यकता असेल, तर राज्य सरकार नक्कीच तसा प्रयत्न करेल, असे देवेंद्र फडणवीसांनी यावेळी स्पष्ट केले.

# महाराष्ट्रात ‘कोयता गँग’ची दहशत!

## अजित पवारांनी थेट विधानसभेत उपस्थित केला मुद्दा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमधील राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे यंदाचे अधिवेशनही वादळी होण्याची शक्यता वर्तवली जात होती. अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी ही शक्यता खरी ठरू लागली आहे. आधी विकासकामांना दिलेल्या स्थगितीचा मुद्दा अजित पवारांनी उपस्थित केल्यानंतर खडाजंगी झाली. त्यानंतर आदित्य ठाकरेंनी रस्ता सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर त्यावरून वाद झाला. मात्र, विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी ‘कोयता गँग’बाबत मुद्दा उपस्थित केल्यानंतर पोलीस प्रशासन आणि नागरिकांमध्ये चिंतेचं वातावरण वाढले आहे. महाराष्ट्रात, विशेषतः शहरी भागांमध्ये कोयता गँगची दहशत वाढू लागल्याची चिंता अजित पवारांनी विधानसभेत बोलताना व्यक्त केली आहे. अजित पवारांनी स्थगन प्रस्ताव मांडत ‘कोयता गँग’चा मुद्दा उपस्थित केला. “राज्याच्या विविध भागांत अशा काही घटना घडल्या आहेत. एक कोयता गँग नावाची गँग निर्माण झाली आहे. ते जातात आणि दहशत निर्माण करतात. काचा फोडतात, महिलांना दमदाटी करतात. हॉटेलमध्ये जाऊन खातात, बिले देत नाहीत. मध्यमवर्गीयांच्या गाड्यांच्या काचा फोडतात. राज्याच्या शहरी भागात हे मोठ्या प्रमाणावर होते, असे अजित पवार यावेळी म्हणाले. जी मुले पकडली जातात, ती कॉलेजची मुले आहेत. कुठेतरी सोशल मीडियावर काहीतरी बघतात, चित्रपट बघतात आणि असा दारू पिऊन गोंधळ घालतात, असेही अजित पवारांनी यावेळी नमूद केले. माझी सरकारला विनंती आहे, की हे कुठल्याही परिस्थितीत थांबले पाहिजे. पोलीस दलाच्या आपण मोठ्या प्रमाणावर बदल्या केल्या आहेत. तो तुमचा अधिकार आहे. पण त्या सगळ्या अधिकाऱ्यांना हे कोयता गँगचे प्रकार होता कामा नयेत, असे आदेश द्यावेत. हवे तर त्यांना मोक्का लावा, तडीपार करा, जी कुठली कठोर कारवाई करायची असेल ती करा, अशी मागणी अजित पवार यांनी यावेळी केली.



# एनआयटी भूखंडप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा; विरोधक आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** 83 कोटी रूपयांचा भूखंड गैर मार्गाने जवळच्या बिल्डरला कवडीमोल भावात देण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलाय. यावरून कोर्टाने देखील मुख्यमंत्र्यांवर ताशेरे ओढले आहेत. एनआयटीच्या अध्यक्षांनी देखील त्याला विरोध केला होता. परंतु, मुख्यमंत्र्यांनी सभागृहात माहिती देताना माझ्याकडे याबाबत माहिती देण्यात आली नव्हती असे सांगितले. त्यामुळे सभागृहासह संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करण्याचे काम त्यांनी केले आहे. कोर्टाने त्यांच्यावर ओढलेले ताशेरे भयानक आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांनी केली आहे. भूखंडाच्या प्रश्नावरून विरोधकांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेतली. परंतु, बोलू दिले जात नसल्याचा आरोप करत विरोधकांनी सभात्याग केला. त्यानंतर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी माध्यमांसोबत संवाद साधत मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.



एकनाथ शिंदे यांनी आपल्याकडून चूक झाल्याचे मान्य केले आहे. शंभर कोटी रूपयांचा भूखंड कवडीमोल भावात बिल्डरला दिलाय. त्यांना खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनाम द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. 2004 पासून या भूखंडाचे प्रकरण न्यायालयात आहे. परंतु, 2021 मध्ये नगविकास मंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी लीज करून जमीनीचा ताबा घ्यावा असा आदेश दिला आहे. त्यावेळी कोर्टाची मध्यस्थी करणाऱ्या व्यक्तीने कोर्टात हे प्रकरण प्रलंबित असल्याने याबाबतचा निर्णय कसा घेतला जाऊ शकतो ही बाब कोर्टाच्या लक्षात आणून दिली, अशी माहिती जितेंद्र आव्हाड यांनी दिली. दरम्यान, शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी देखील या मुद्यावरून सरकारवर जोरदार टीका केलीय. एनआयटीच्या भूखंडाचा विषय न्याय प्रविष्ट आहे. सध्याच्या मुख्यमंत्र्यांवर न्यायालयाने ताशेरे आढले आहेत. साधारणपणे या भूखंडची किंमत 100 कोटींच्या आसपास आहे.

# मैं नफरत के बाजार में मोहब्बत की दुकान खोल रहा हूं

## खासदार राहुल गांधींनी स्पष्ट केला भारत जोडो यात्रेचा उद्देश




आधुनिक केसरी न्यूज

**अलवर :** कॉंग्रेस खासदार राहुल गांधी मागील १०० दिवसांपासून ‘भारत जोडो’ यात्रेचे नेतृत्व करत आहेत. कन्याकुमारी ते जम्मू काश्मीर अशी ही यात्रा आहे. सध्या ही यात्रा मध्य प्रदेशात पोहोचली आहे. दरम्यान, राहुल गांधींनी भारत जोडो यात्रेचा नेमका हेतू काय आहे? याबाबत खुलासा केला आहे. आपण द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान उभारत आहोत, असे राहुल गांधींनी सांगितले. ते राजस्थानमधील अलवर येथे ‘भारत जोडो’ यात्रेनिमित्त आयोजित सभेत बोलत होते.

या कार्यक्रमाला कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, मुख्यमंत्री अशोक गेहलोत, प्रदेशाध्यक्ष गोविंद सिंग दोतसरा आणि माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्यासह कॉंग्रेसचे अनेक नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राहुल गांधी म्हणाले, मागील १०० दिवसांपासून ‘भारत जोडो’ यात्रा सुरू आहे. अनेकदा मी भाजपाच्या कार्यालयापासून गेलो. यावेळी भाजपाचे नेते, पदाधिकारी कार्यालयाच्या बाहेर हाताची घडी घालून उभे राहतात. त्यांनाही माझ्याकडे पाहून हातवारे करायचे असतात, पण ते तसे करू शकत नाहीत. अशावेळी मी त्यांना ‘फ्लाइंग किस’ देतो. मी त्यांचा अजिबात द्वेष करत नाही. माझी लढाई त्यांच्या विचारधारेविरुद्ध आहे, पण हे लोक मला आवडतात, असेही राहुल गांधी म्हणाले.

त्यांचे नेते कधी कधी विचारतात, राहुल गांधी असे भारत जोडो यात्रेत का फिरत आहेत? यावर मी विचार करत होतो की, ‘खरेच मी का फिरतोय?’ मी लोकांमध्ये फिरतोय, लोकांना भेटतोय आणि लोकांना मिठी मारतोय, पण हे सगळे मी का करतोय? याचे उत्तर मला सापडले. नफरत के बाजार में मोहब्बत की दुकान खोल रहा हूं (द्वेषाच्या बाजारात प्रेमाचं दुकान उभारत आहे), असे गांधी म्हणाले. भाजपाला उद्देशून राहुल गांधी म्हणाले, तुम्ही माझा तिरस्कार करता, मला शिव्या देता. ही तुमच्या मनातील भावना आहे. तुमचा द्वेषाचा बाजार आणि माझं प्रेमाचं दुकान आहे. यापूर्वी महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कॉंग्रेसनेही भारताला स्वातंत्र्य मिळवून देणासाठी द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान थाटले होते. आम्हीही तेच करत आहोत.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# शाश्वत समाधानाचे मुक्त विद्यापीठ : ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

आधुनिक केसरी

आज गोंदवलेकर महाराजांची पुण्यतिथी. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेण्याचा केलेला हा अल्पसा प्रयत्न
धर्म, अध्यात्म यांच्या नावावर बऱ्याच ठिकाणी बाजार मांडलेला पाहिला जात असताना, लोकांना साधी सोपी उपासना सांगणाऱ्या मुक्त विद्यापीठाचे नाव आहे ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज. प्रपंचात राहून परमार्थ कसा साधावा, प्रपंच आणि परमार्थ एकमेकात कसा मिसळून द्यावा याचे सोप्या भाषेत लोकांना ज्ञान देणारे विद्यापीठ म्हणजे गोंदवलेकर महाराज. तुम्ही गरीब असा की श्रीमंत, शिकलेले असा की अशिक्षित, स्त्री असा की पुरुष, पंडित असा वा सामान्य व्यक्ती तुमची कोणतीही पात्रता पाहिल्याशिवाय प्रवेश देणारे एकमेक मुक्त विद्यापीठ म्हणजे गोंदवलेकर महाराज. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात जे थोर संत होऊन गेले त्यातील सर्वात सोपी शिकवण देऊन लोकांना परमार्थ मार्गाकडे वळवणारे महान संत म्हणजे ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज. सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील गोंदवले हे महाराजांचे गाव. गणेश रावजी घुगरदरे असे त्यांचे



मूळ नाव होते. महाराजांच्या घरात परंपरेने चालत आलेली विठ्ठलभक्ती आणि पंढरीची वारी होती. कुल्कर्णीपण होते. महाराजांच्या अंगात लहानपणापासूनच विरक्ती होती. ते नऊ वर्षांचे असतानाच गुरूच्या शोधार्थ निघाले होते. वडिलांनी त्यांना परत घरी आणले. ते अकरा वर्षांचे असतानाच त्यांचा विवाह झाला. पण त्यांचे चित्त संसारात नव्हते. पुन्हा गुरूच्या शोधार्थ ते बाहेर पडले. शेवटी मिळालेल्या आदेशानुसार नांदेड जवळील येहेळेगाव येथे श्रीसंत तुकामाईंकडे ते गेले आणि तुकामाई हे त्यांचे गुरु झाले. त्यांनीच त्यांचे नाव ' ब्रह्मचैतन्य ' असे ठेवले. श्रीमहाराजांची गुरूंनी कठीण परीक्षा घेतली. पण ते गुरूंच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. गुरूंची सेवा केली. पुढे गुरुंच्याच आदेशानुसार लोकांना त्यांनी भक्तिमार्गाला लावले. ' संतांचिया गावी प्रेमाचा सुकाळ, नाही तळमळ दुःखलेश ' असे संत तुकाराम महाराज म्हणतात. असे अखिल मानवजातीबद्दल प्रेम असणारी व्यक्ती म्हणजे संत. अशाच प्रकारची लोकांच्या उद्धाराची तळमळ श्री गोंदवलेकर महाराजांना लागून राहिली होती. त्यातूनच त्यांचे कार्य घडत गेले. गोंदवलेकर महाराजांचे रामावर फार प्रेम होते. त्यातूनच त्यांनी लोकांना रामनामाचे महत्व सांगून भक्तिमार्गाला लावले. **क्रमशः**



## आनंदी पहाट

# आध्यात्मिक ग्रंथांद्वारे मूल्यशिक्षण प्राप्त होते

आधुनिक केसरी

अध्यात्मिक साहित्यात अध्यात्मिक व्यक्तीशी सुसंगत असलेली पाच मूल्ये प्रकट होतात. यामध्ये अर्थ शोधणे, परोपकारी प्रेम, आत्म-जागरूकता, दृष्टी आणि सत्यता यांचा समावेश होतो. काही मूल्ये विस्तृत आणि व्यापक रीतीने कार्य करतात, जे उप मूल्यांचा अभ्यास करण्यास परवानगी देतात, जसे की; विश्वास, ध्यान, सकारात्मक विचार आणि नम्रता ही होय. व्यक्तीच्या प्रत्येक पातळीवर मूल्ये आणि अध्यात्माचे शिक्षण माणसाचे व्यक्तिमत्त्व समृद्ध करते, असे प्रकर्षाने जाणवते. जीवनशैलीतील ऐच्छिक साधेपणामुळे बराच खर्च वाचतो आणि एखाद्या व्यक्तीला त्याच्या संसाधनांमध्ये अन्यायकारक किंवा अप्रामाणिक मार्गाने भर घालण्याच्या मोहापासून संरक्षण मिळते. अध्यात्मिक शिक्षणाचा उद्देश मुलांच्या आत्मिक, आंतरिक क्षमतांची पूर्तता करणे आणि त्यांना येणाऱ्या अनेक अनुभवांमध्ये शिकत राहण्यासाठी आवश्यक असलेली साधने देऊन त्यांना जीवनासाठी तयार करणे हा आहे. ज्यांचे आध्यात्मिक आरोग्य चांगले आहे ते सामान्यतः आशा, सकारात्मक दृष्टीकोन, क्षमा / स्व-स्वीकृती, वचनबद्धता, अर्थ व उद्देश, आत्म-मूल्याची भावना, स्पष्ट मूल्ये आणि शांतीची भावना प्रदर्शित करतात. मूलभूत आध्यात्मिक मूल्ये म्हणजे प्रामाणिकपणा / एकात्मता, विश्वासार्हता, सहकार्य, आदर, संयम, जबाबदारी, लवचिकता आणि एकता ही होय. संवेदनात्मक अनुभवापेक्षा मानव असण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे आणि ज्याचा आपण एक भाग आहोत. मुलांमध्ये चांगली नैतिक मूल्ये रुजवणे जरुरीचे असते. अधिक चांगले पैलू आणि लोकशाही मार्गाने विचार विकसित करणे महत्वाचे असते. मुलांचे चांगले नागरिकत्व आणि राहणीमान तसेच वर्तन विकसित करणे गरजेचे असते. सहिष्णुता विकसित करणे आणि मुलांसाठी एक दयाळू व्यक्ती बनवणे हे अत्यंत आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## मिळे ज्याचे त्यासी | कर्म फळ ||

कुणाचे फुकाचे | घालू नये मुखी ||
तोच खरा सुखी | कष्टकरी ||१||
दुसऱ्याचे धन | लखलाभ त्याला ||
मोह या जीवाला | नको देवा ||२||
आयते घबाड | नाशाला कारण ||
दानवाचे श्वान | तरी बरे ||३||
गरीबीचा भार | सोसेन आनंदें ||
भोगेन स्वानंदे | भोग सारे ||४||
हरिनामा पुढे | थिट्या धन राशी ||
मीळे ज्याचे त्यासी | कर्मफळ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

### भक्ती

यशश्च मे धनं च मे मोदं च मे सुखं च मे ।
उमे रमे च शारदे देहि मे वरदेऽम्बिके ।।८।।
हे उमादेवी, रमादेवी, शारदादेवी, अंबिके, वरदे मला यश, धन, आनंद, सुख लाभो. यशश्च मे धनं च मे मोदं च मे सुखं च मे ।
उमे रमे च शारदे देहि मे वरदेऽम्बिके ।।८।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



# चतुर्दशब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

परमार्थ म्हणजे काय-ब्रम्हज्ञानी लोक खात्रीपूर्वक सांगतात की,परमात्मवस्तु अपरंपार आहे. तिच्या छोट्याशा भागावर पण विश्वाचा देखावा दिसतो. मुळातच परमात्मस्वरूप असलेले विश्व आपल्या इंद्रियांना पदार्थ रूप दिसते.वास्तविक ते तसे नाही. कारण इंद्रियांना खरेखोटे समजत नाही. इंद्रियांना दिसणारे पदार्थ हे ब्रम्ह आतबाहेर व्यापून आहेत. पण विश्वाच्या बाहेर ते आणखी किती आहे याचा पत्ता कोणालाही लागला नाही. ब्रम्ह अतिसूक्ष्म आहे. ते अतींद्रिय आहे सदोदित आपल्या जवळ आहे. ते संपूर्ण खरे असल्याने त्याच्या मानाने आपले हे विश्व झोपेतल्या स्वप्नात असल्या प्रमाणे वाटते. आपण देहबुद्धीत आहोत तोपर्यंत ते खरे वाटते व जडत्वाने अनुभवायला मिळते. पण ज्ञानाची तळमळ लागल्यावर तेच परमात्मस्वरूप अनुभवायला येते.तेव्हा ज्ञानाची खरी ओळख साधणे म्हणजे "परमार्थ"होय. ब्रम्ह स्वरूप विशाल आहे. सर्व विश्वाला सर्व बाजूंनी व्यापून आहे. जीवाला आतबाहेर चिकटून आहे. पण ते आपल्या जवळ आहे याची जाणीव आपल्याला नसते. **ब्रम्ह कसे आहे**- ते आकाशासारखे पोकळ आहे रूप नासलेले व बेहद्द विशाल आहे. एकवीस स्वर्ग,सात पाताळे मिळून एक ब्रम्हगोल होतो. अशा विशालकाय ब्रम्हाला त्या निर्मल ब्रम्हाने व्यापले आहे. म्हणजेच जळी स्थळी काष्टी, पाषाणी ब्रम्ह व्यापून राहिले आहे. जन्मलेल्या बाळापासून ते मरेपर्यंत सर्वांना ब्रम्हाची गरज आहे. आकाशाच्या पुढे कोणी जात राहिला तर तो जिकडे जाईल तिकडे आकाश त्याच्या पुढे जात राहील म्हणून ब्रम्हाला कधीही कोठेही शेवट नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# भगवंताला पाहण्यास स्वांतर शुद्ध करावे

आधुनिक केसरी

'अंते मतिः सा गतिः' असे एक वचन आहे. जन्माचे खरे कारण शोधून पाहिले तर हेच आढळेल की, वासनेमुळे जन्माच्या फेर्‍यात आपण सापडलो. जन्माच्या पाठीमागे मरण हे ठेवलेलेच असते. जन्ममरणाचा ओघ सतत चाललेला आहे. वासना आधी का जन्म आधी, या वादात पडणे म्हणजे बीज आधी का झाड आधी यासारख्या, जगाच्या अंतापर्यंत कधी न सुटणाऱ्या प्रश्नाबद्दल काथ्याकूट करणे होय. आपल्याला नडते कुठे ते पाहावे. विषयांतच आम्ही गुंतून राहतो ते सोडावे. असत्यातूनच सत्य कसे जाणता येईल ते पाहावे. इथून कुणीतरी गेले, असे सावलीवरून आपण म्हणतो. त्याप्रमाणे ही जगत्‌रूप सावलीच आहे. तिला असणारे खर्‍याचे अधिष्ठान जो ईश्वर, त्याला आपण जाणून घेण्याचा प्रयत्‌न करू या. आपल्या डोळ्यांवर विषयाची धुंदी असल्यामुळे, सर्व ठिकाणी भरलेला भगवंत आपल्याला नाही पाहता येत. त्याला पाहण्यासाठी दृष्टी निराळी करावी लागते. आपण आपले अंतरंग साफ केले तर तशी दृष्टी येते. आपण कोणा स्त्रीकडे पाहू लागलो तर आपली जशी वृत्ति असेल तशी ती दिसते; कामी असेल त्याला ती तशी दिसू लागेल, आणि सात्त्विक असेल त्याला ती मातुःश्रीच दिसू लागेल. म्हणून



काय, की जोपर्यंत आपले अंतःकरण शुद्ध नाही तोपर्यंत आपल्याला सर्वत्र भगवंत दिसणार नाही. भगवंत सर्व ठिकाणी पाहताना तो आपल्यातही आहे हे पाहिले पाहिजे. जोपर्यंत भगवंत आपल्यात आहे हे दिसून येत नाही, तोपर्यंत तो इतरांत असलेला आपल्याला दिसणार नाही. म्हणून भगवंत सदासर्वकाळ आपल्यात आहे हे पाहू लागले पाहिजे. सद्‌गुरु सांगेल तसे वागावे. त्यामुळे आपला अभिमान नाहीसा होतो. संतांचा थोडासा कटाक्ष जो कर्ममार्गावर आहे तो याचकरिता की, कर्म करण्याने अभिमान येतो, आणि त्याउलट, गुरुआज्ञेत वागल्याने तोच अभिमान नाहीसा होतो. इथे शंका वाटेल की, गुरू तरी नामस्मरण करायलाच सांगतात, म्हणजे कर्म आहेच ना ! वैद्याने एका रोग्याला सांगितले की तू काही खाऊ नकोस. त्याला वैद्याने औषधाच्या तीन पुड्या दिल्या, आणि त्या तीन वेळा घे म्हणून सांगितले. त्यावर तो रोगी म्हणाला, " तुम्ही काही खाऊ नको म्हणता, आणि या पुड्या घ्या म्हणून सांगता, हे कसे ? " त्यावर वैद्याने सांगितले, "पूर्वी जे अजीर्ण झाले आहे त्याचा नाश करण्यासाठी या पुड्या उपयोगी आहेत." त्याप्रमाणे, गुरू आपल्याला नामस्मरण करायला सांगतात ते पूर्वीचा विषयाचा अनुभव नष्ट करण्यासाठी. जो आपली विषयवासना कमी करून आपल्यामध्ये नामाचे प्रेम उत्पन्न करील तोच खरा सद्‌गुरू होय.

**आजचे बोधवचन आहे** - प्रपंच व परमार्थ यांचा छत्तिसाचा आकडा पाहून, संतांनी तडजोड करण्याचा प्रयत्‌न केला, नामस्मरण करीत करीत प्रपंच करा, हीच ती तडजोड.

# सुप्त क्षमता व्यक्त होणे म्हणजे विकास

## विनोद जैतमहाल यांचे प्रतिपादन; स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प उत्साहात





आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** विद्यार्थ्यांच्या सुप्त क्षमता लवकर ओळखल्यास एकूणच व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊन आत्मविश्वास प्राप्त होतो, असे प्रतिपादन पत्रकार, कवी विनोद जैतमहाल यांनी येथे केले. सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्या मंदिर येथे 'आधुनिक काळातील व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर ते बोलत होते. दै. मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प विनोद जैतमहाल यांनी केडगाव येथे 20 डिसेंबर रोजी गुंफले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला स्व. मोहनलाल बियाणी यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केला.या वेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉक्टर रवींद्र चोभे, प्रा. संदीप भोर, दैनिक आधुनिक केसरीचे संपादक डॉ. प्रभू गोरे, राजस्थानी मल्टिस्टेटचे विभागीय व्यवस्थापक राधेश्याम झंवर, सल्लागार राजेश बाठिया, विष्णुदास बजाज, वैभव नरवाडकर, अर्जुन वावळे, मराठवाडा साथीचे अहमनगर आवृत्ती प्रमुख बाजीराव खांदवे, बाबासाहेब वायकर प्राचार्य उदयनराजेस गिगाबाईट कॉम्प्युटर टायपिंग केडगाव, आधुनिक केसरीचे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी, पत्रकार संदीप घंटे, शिक्षिका अनिता क्षीरसागर, अर्चना कुलकर्णी, मनिषा वर्पे, अंकिता वरशिंदकर, अविनाश साठे, शिवाजी मगर, सागर पोटे, मनिषा काळे, स्वाती सूर्यवंशी, मोहिनी धर्माधिकारी आदींची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विनोद जैतमहाल पुढे म्हणाले की, शारीरिक, भावनिक, बौद्धिक, सामाजिक व आत्मिक विकास होणे हा प्रत्येक विद्यार्थ्याचा हक्क आहे. घर, शाळा आणि समाजात योग्य वातावरण मिळाल्यास हा विकास वेगाने होतो. शारीरिक विकासासाठी खेळ, व्यायाम, योग्य आहार आवश्यक आहे. भावनिक विकासासाठी स्वतःच्या भावनांमधील शक्ती ओळखली पाहिजे. चांगल्या भावनांचा योग्य वापर आणि वाईट भावनांचा निचरा होणे गरजेचे आहे. बौद्धिक विकास होण्यासाठी बुद्धीला चालना देणारे खेळ, चिकित्सेची सवय, तर्क, कल्पनाशक्तीला धार लावावी. सामाजिक विकासासाठी संवाद कौशल्य महत्त्वाचे आहे. समाजात वावरत असताना आपल्या मनाला येईल तसे बेजबाबदार आणि बेदरकारपणे वागू नये. अलिखित सामाजिक नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. आपल्याला मिळालेल्या हक्काबरोबरच इतरांच्या हक्कांचे देखील रक्षण करणे आपली जबाबदारी आहे. शेवटी स्वार्थापलीकडे जाऊन विश्वाच्या भल्यासाठी काम करणे म्हणजे आत्मिक विकास ही व्यक्तिविकासाची सर्वोच्च स्थिती आहे, असेही विनोद जैतमहाल यांनी सांगितले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ग्रा.पं. निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपाच नंबर वन

## प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये २४८२ ग्रामपंचायती जिंकून पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टी नंबर वन ठरली आहे. या यशाबद्दल आपण कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो आणि मतदारांचे आभार मानतो, असे प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी सांगितले. ते म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात भाजपा – बाळासाहेबांची शिवसेना युतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत पुन्हा एकदा मतदारांनी युतीला कौल दिला आहे. उपलब्ध आकडेवारी ध्यानात घेता भाजपाचा दणदणीत विजय झाल्याचे दिसते. सोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बाळासाहेबांची शिवसेना पक्षाला ८४२ ग्रामपंचायतींमध्ये यश मिळाले आहे. आमच्या विरोधी पक्षांच्या एकत्रित संख्येपेक्षा अधिक सरपंच भाजपा – बाळासाहेबांची शिवसेना युतीचे निवडून आले आहेत. सत्तांतरानंतर यापूर्वी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीतही मतदारांनी युतीला पसंती दिली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जात असताना आता महाराष्ट्रातही त्यांच्या विचारांच्या



सरकारचे काम राज्यातील जनतेला पसंत पडले आहे. आपण या विजयाबद्दल एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे विशेष अभिनंदन करतो, असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, राज्यातील ग्रामीण जनतेने ग्रामपंचायत निवडणुकीत पुनःपुन्हा शिंदे फडणवीस सरकारला पसंती दिली आहे. याच पद्धतीने आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही युती विजयी होईल. तसेच महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकीत शहरी मतदारही भाजपा – बाळासाहेबांची शिवसेना युतीला कौल देईल याची खात्री आहे.

# पैठण तालुक्यातील 22 ग्रा.पं. पैकी 16 ग्रा.पं.वर पालकमंत्री भुमरे (शिंदे गटाचे) वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील २२ ग्रामपंचायत निवडणुकीचे निकाल हाती आले असून २२ पैकी १६ ग्रामपंचायत शिंदे गटाकडे तर २ ग्रामपंचायत उद्धव ठाकरे गटाकडे ३ राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष तर १ देवगाव या एकमेव ग्रामपंचायतीवर भाजपाने कब्जा केला आहे तर या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला खाते ही उघडता आले नसल्याने पक्षाची वाताहत झाल्याचे दिसून येत आहे मंगळवार दि.२० रोजी सकाळी १० वाजता पैठण येथील तहसील कार्यालयात तहसीलदार शंकर लाड,नायब तहसीलदार दत्तात्रय निलावड,विष्णु घुगे, गिरजा शंकर आवळे, निवडणूक विभागातील अमोल पाखरे यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणीस सुरुवात झाली यावेळी संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागलेल्या 22 गावातील ग्रामपंचायत पैकी १६ ग्रामपंचायत वर संभाजीनगरचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांचे वर्चस्व सिध्द केले असुन नवनिर्वाचित सरपंच व सदस्याचा विलासबापु प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला.



# निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबांना वैजापुरात अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राष्ट्रसंत, स्वच्छता जनक तथा निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या १६६व्या पुण्यतिथी निमित्त वैजापूर शहरातील श्री संत गाडगेबाबा स्मृती स्मारक येथे शहरातील सर्व स्तरावरील नागरिकांनी एकत्र येऊन मंगळवार (दि,२०)रोजी संत गाडगेबाबा यांना अभिवादन कार्यक्रम संपन्न केला. यानिमित्त प्रवचन, महाप्रसाद, व सत्कार समारंभ ही आयोजित करण्यात आला होता, धोबी-परिट सेवा मंडळाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात प्रथम ह.भ.प. हरिनाथ महाराज ढंगारे,सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपुत यांनी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार टाकून अभिवादन केले. नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान,नगरसेवक प्रकाश चव्हाण, स्वप्निल जेजुरकर, गणेश खैरे, शैलेशचव्हाण स्वप्नील जेजूरकर, राजेंद्र साळुंखे, लिमेश वाणी, खुशाल सिंह राजपुत, बाबासाहेब जगताप, अखिल शेख, अल्ताफ बाबा, हिकमत उल्लाह, सुरेश तांबे, श्रीकांत साळुंके, गौरव दौडे, रणजित चौहान, पारस घाटे, वैजीनाथ मिटकरी, ज्ञानेश्वर घोडके, घनश्याम वाणी सोपान निकमयांनी अभिवादन केले. प्रास्ताविक धोंडीराम राजपूत यांनी केले. श्रीमती परदेशी, साबेरखान यांनी मार्गदर्शन केले. या सर्वांचा सेवा मंडळाचे,सर्वश्री अमोल गायकवाड, रवींद्र हौसारे, बाबा त्रिंभुवन,आसाराम निकम, भागीनाथ निकम, सुरेखा हौसारे, छाया राऊत, अभिषेक गायकवाड, सुखदेव गायकवाड, पुंडलिक निकम, फकिरा निकम, सोपान निकम गाधर राऊत, आबा निकम, वसंत गायकवाड, बाळू निकम, गुलाब गायकवाड, सूर्यभान त्रिभुवन यांनी स्वागत केले. सूत्रसंचलन डी.डी. ठाकूर यांनी केले. आभार आसाराम निकम यांनी आभार मानले.



## लव्ह जिहादला जरब बसणार का ?

आधुनिक केसरी

लव्ह जिहादचे प्रमाण गेल्या काही वर्षात खूपच वाढले असून देशभरात हजारो प्रकरणे नोंदली जात आहे. देशातील ११ हून अधिक राज्यांनी स्वतंत्र कायदेशीर तरतुदी करून या प्रकारांना जरब बसविण्याचे प्रयत्न सुरू केल्याने तेथे या प्रकरणांची वेगळी नोंद होत आहे. मात्र ज्या राज्यांमध्ये विशेष कायदा नाही, त्या राज्यांमध्ये भारतीय दंड संहिता व फौजदारी दंड संहिता या अंतर्गत फसवणूक, सक्तीचे धर्मांतर आणि कौटुंबिक हिंसाचार कायदा या अंतर्गत गुन्हे दाखल केले जात आहेत. या गुन्ह्यांनाविविध पैलू असल्याने संबंधितांना कठोर शिक्षा करण्यासाठी विशेष कायदा करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये हे गुन्हे मोठ्या प्रमाणावर घडत असल्याचे वास्तविक केंद्र सरकारने विशेष कायदा करण्याची गरज असून सध्या अनेक राज्य सरकारांनी त्यासाठी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रात केवळ मुंबई-पुणेच नाही, तर कोकण, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात नगरसारख्या जिल्ह्यातही लव्ह जिहादची प्रकरणे आढळून येत आहेत. लव्ह जिहाद म्हणजे विवाहाचे आमिष दाखवून होणारे सक्तीचे धर्मांतर किंवा त्या नावाखाली होणारी फसवणूक. विवाह, नोकरी किंवा अन्य आमिष दाखवून किंवा दहशतीने हिंदू धर्मीयांचे मुस्लिम, ख्रिश्चन धर्मात धर्मांतराचे प्रकार गेल्या काही वर्षात वाढले आहेत. तर विवाहाच्या आमिषाने किंवा लिव्ह इनमध्ये राहण्यासाठी हिंदू धर्मीय मुलींना फूस लावण्याचे व पळवून नेण्याचे प्रकार होत आहेत. या प्रकारांसाठी भारतीय दंडविधान आणि फौजदारी दंडसंहिता प्रक्रियेनुसार फसवणुकीचे गुन्हे दाखल होत होते. त्यात आर्थिक देवाणघेवाण सिद्ध करणे कठीण होते आणि सात वर्षांपर्यंत सक्तमजुरीच्या शिक्षेची तरतूद आहे. मारहाण, शारीरिक इजा असेल तर अन्य तरतुदींबरोबरच कौटुंबिक हिंसाचार कायद्यातील तरतुदींचा वापर केला जात आहे. केवळ कुटुंबातील व्यक्तीच नव्हे, तर घरकाम करणाऱ्या व्यक्ती, लिव्ह इन मध्ये राहणाऱ्या व्यक्तींवर अत्याचार केल्यास या कायद्यातील तरतुदी लागू होऊ शकतात, असे निकाल उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. पण सध्याच्या कायदेशीर तरतुदींपेक्षा लव्ह जिहादच्या प्रकरणांमधील अनेक कंगोरे व पैलू पाहता गुन्हेगारांना जरब बसविण्यासाठी अनेक राज्यांनी विशेष कायदा करून दहा वर्षे सक्तमजुरी आणि दंडाची तरतूद विशेष कायद्यातील तरतुदींद्वारे केली. या प्रश्नावर राजकीय भूमिका म्हणूनही स्वतंत्र कायदे करणे, त्या राज्य सरकारांच्या दृष्टीने महत्वाचे व सोयीचेही होते. उत्तर प्रदेश सरकारने २०२० मध्ये सक्तीचे धर्मांतर बंदी घालणारा कायदा केला. मध्यप्रदेश सरकार ने ही त्याच धर्तीवर कायदा केला. सक्तीच्या धर्मांतराच्या गुन्ह्यासाठी एक ते पाच वर्षे सक्तमजुरी, मुलगी अज्ञान, अनुसूचित जाती-जमातीची असल्यास तीन ते दहा वर्षे सक्तमजुरी व ५० हजार रुपये दंड, सामूहिक धर्मांतर असेल तर तीन ते दहा वर्षे सक्तमजुरी व दंडाची तरतूद केली. विवाहानंतरच्या धर्मांतरासाठी जिल्हाधिकाऱ्यांना दोन महिन्यांची पूर्वकल्पना किंवा नोटीस देणे बंधनकारक करण्यात आले आहे. गुजरात सरकारने एप्रिल २०२१ मध्ये धर्मस्वातंत्र्याचा कायदा, २००३ मध्ये सुधारणा करून सक्तीचे धर्मांतर रोखण्याच्या तरतुदी केल्या. विवाहाच्या आमिषाने फसवणूक करुन धर्मांतर केल्यास तीन ते दहा वर्षे सक्तमजुरी व पाच लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आली.

## पेरियार रामासामी अभ्यासक्रमात का नाहीत ?




भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

आधुनिक केसरी

**तामिळनाडू या द्रविडभूमीत पेरियार यांच्या प्रभावशाली वैचारिक वारस्यामुळे समाजमनात द्वेष पसरवणारे जातीय वर्चस्ववादी तामिळनाडूतील सत्तेच्या सारीपाटापासून दूर राहिले असल्यामुळे आता हिंदुत्ववादी शक्तींकडून तामिळभूमीला लक्ष्य केले जात आहे आणि राज्यातील द्रविड चळवळ संपवणे हा त्यांचा अजेंडा बनला आहे. द्रविडीयन चळवळीतील जयललिता व करुणानिधी या दोन दिग्गज नेत्यांच्या निधनानंतर हिंदुत्वाची ताकदवान लॉबी पैसा आणि बाहूबळाचा वापर करून पेरियार यांच्या द्रविडभूमीत येनकेनप्रकारे घुसण्याचा मोठा धोका निर्माण झालेला आहे.**

२०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भाजपासारख्या हिंदुत्ववादी पक्षाच्या हाती काहीही लागले नसले तरी २०२१ च्या विधान सभेच्या निवडणुकीत ४ जागांवर विजय मिळवून तामिळनाडू राज्यात त्यांनी चंचूप्रवेश केलेला आहे हे तेथील द्रविड चळवळीला फार मोठे आव्हान तर आहेच पण धोक्याची घंटा सुद्धा आहे! पेरियार यांच्यासारख्या क्रांतिकारी सामाजिक व सांस्कृतिक सुधारकांचे संघर्षमय जीवन तामिळनाडू आणि उर्वरित देशातील शाळा-महाविद्यालयांमध्ये का शिकवले जात नाही? त्यांनी द्रविडभूमीतील समाजमनात आपल्या तत्त्वज्ञानाने जो अभूतपूर्व बदल घडवून आणलेला आहे, ते तत्त्वज्ञान काहीच महत्त्वाचे नाही का? पेरियार यांच्या साहित्य आणि कार्याबद्दल आफ्रिकन-अमेरिकन लोकांना कितपत माहिती आहे हे सांगता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन इंग्रजीत असल्यामुळे परदेशात सर्वत्र चर्चिले जात आहे. पेरियार यांचे संपूर्ण लेखन व भाषणे ही तमिळमध्ये असून त्याचे इंग्रजीत भाषांतर आता कुठे हळूहळू होत आहे. त्यासाठी पेरियार रामासामी संस्थापक असलेल्या द्रविड कळघम या संघटनेकडून डॉ. के. वीरमणी, जे या संघटनेचे विद्यमान अध्यक्ष आहेत ते बऱ्यापैकी लक्ष्य घालीत आहेत. पेरियार हे तामिळनाडूच्या सार्वजनिक जीवनातील सर्वात प्रभावशाली व्यक्ती होते. कुठल्याही प्रागतिक विषयावर स्पष्टपणे बोलण्याची हिंमत त्यांच्यात होती. स्त्रीविषयक त्यांचे लेखन आजही अतुलनीय आहे. त्यांना एक महान स्त्रीवादी म्हणूनही संबोधले जाते. पेरियार यांनी सर्व प्रकारच्या समाजकंटकांच्या विरोधात आपल्या लेखणी व वाणीच्या फटकाऱ्याने त्यांच्या मुळावरच प्रहार केला होता. पेरियार यांचे तत्त्वज्ञान आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणे आवश्यक आहे आणि मानवतावाद, तर्कशुद्ध विचार आणि ब्लॅक शर्ट मुहमेंट; हे त्यांचे प्रेरणादायी विचार व चळवळ जगभरात पोहचले पाहिजेत. पेरियार हे केवळ बुद्धिवादी आणि नास्तिक नव्हते, तर त्यांनी परखडपणे त्यांच्या विचारांचा प्रचार केला होता. तामिळनाडूमध्ये पेरियार या आदर्श मॉडेलचे यश असे सूचित करते की जर आपण सार्वजनिक कारणासाठी खरे असलो तर आपण खोट्या धार्मिक विश्वासांविरुद्ध निःसंकोचपणे बोलू शकतो आणि यशस्वी सुद्धा होऊ शकतो. आजचे राजकारणी हे करू शकत नाहीत कारण ते धार्मिक अंधश्रद्धेचा वापर त्यांच्या भक्तांना प्रोत्साहन देण्यासाठी करतात. पेरियार यांना बुद्धिहीन अंधभक्त नव्हे तर प्रबुद्ध अनुयायी हवे होते आणि त्यामुळेच ते यशस्वी झाले. द्रविडीयन तत्त्वे आणि पेरियार यांचे कार्य संपवण्याचा प्रयत्न केला जात असला तरी हिंदुत्ववादी शक्तींना तामिळनाडूने भूतकाळात नाकारले होते तसेच ते त्यांना आत्ताही नाकारतील हा सामान्य जनतेचा आशावाद आहे. १९५५ मध्ये, पेरियार यांनी रामायणातील द्रविडविरोधी पात्रांवर आक्षेप घेतला आणि असे म्हटले की वाल्मिकींचे रामायण हे खरे तर आर्य वर्चस्वाला चालना देणारे साहित्यिक आणि सांस्कृतिक साधन आहे. हाच तो काळ होता जेव्हा त्यांनी तमिळमध्ये द रामायणः अ ट्रू रीडिंग लिहिलं होतं, ज्याचा इंग्रजीतीलअनुवाद १९५९ मध्ये प्रकाशित झाला होता. पुस्तकाचा हिंदी अनुवाद १९६८ मध्ये सच्ची रामायण; या नावाने प्रकाशित झाला होता. राम अधार या लेखकाने हा अनुवाद केला तर ललई सिंग यांनी ते प्रकाशित केले होते. पुस्तकाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली आणि सरकारने त्यावर बंदी घातली. १६.९.१९७६ या दिवशी भारताच्या सुप्रीम कोर्टाने या पुस्तकावरील बंदी उठवीत असल्याचा निर्णय दिला. मार्च २००० मध्ये औरंगाबाद येथील भीमराव सरवदे (या ग्रंथाचे लेखक) यांनी या पुस्तकाचा मराठी अनुवाद रामायणातील सत्य या नावाने केला असून यानंतरही या पुस्तकामुळे अनेकदा वादळं निर्माण झाली होती. तथापि, हे पुस्तक ब्राह्मणवादाला विरोध करणाऱ्या भारतीयांसाठी व बुद्धिवाद्यांसाठी एक महान प्रेरणा ठरले. १९६८ मध्ये, पेरियार यांनी तामिळनाडूचे तत्कालीन मुख्यमंत्री सी.एन. अन्नादुराई यांना सर्व सरकारी कार्यालयांमधून देव-देवतांच्या प्रतिमा काढून टाकण्याचे निर्देश देणारे परिपत्रक जारी करण्यास प्रवृत्त केले. भारत धर्मनिरपेक्ष राहील याची खात्री करण्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. १९६९ मध्ये त्यांनी जातीय भेदभावाविरुद्ध आणखी एक पाऊल उचलले. मंदिरांच्या गर्भगृहात फक्त ब्राह्मणांनाच प्रवेश दिला जात होता. ते बदलण्यासाठी त्यांनी चळवळ सुरू केली आणि धार्मिक विधी संस्कृतऐवजी तमिळमध्ये केले जातील याचीही खात्री केली. पेरियार यांनी ब्राह्मणेतरांचे सामाजिक-सांस्कृतिक जीवन अधिक चांगले बनवण्यात महत्त्वपूर्ण असा यशस्वी संघर्ष केला. त्यांच्या रामायणालाही सत्य असे शीर्षक दिले होते. आर्यांकडून पाळला जाणारा वांशिक भेदभाव आणि ब्राह्मणांच्या कारस्थानांवर प्रकाश टाकण्यासाठी शास्त्र- पुराणाच्या मूळ आवृत्तीतील असत्यांचा पर्दाफाश करणे त्यांना आवश्यक वाटले. पेरियार यांचे लेख आणि भाषणे अत्यंत सोप्या व स्थानिक भाषेत असल्यामुळे सामान्य माणसांनाही त्यांनी व्यक्त केलेले जातीबद्दलचे विचार समजण्यास सोपे जाते. ब्राह्मणांनी लिहिलेल्या हिंदू ग्रंथांमध्ये अनेक विरोधाभास आहेत जे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा त्यांच्या द रिडल्स ऑफ हिंदूइझम या पुस्तकात विशद केलेले आहेत. पेरियार यांच्या काही जाती-संबंधित लिखाणांमध्ये द्रविडांना हिंदू म्हणून पाहिले जाऊ नये, असा युक्तिवाद त्यांनी केलेला आहे. हिंदू धर्मात आर्य आणि ब्राह्मण वर्चस्वावर जोर दिल्याने त्यांना तसे वाटणे साहजिक आहे. ६ जानेवारी १९४५ च्या कुडिआरसू (प्रजासत्ताक) मधील संपादकीयमध्ये त्यांनी लिहिले होते की, आम्ही खूप आधीपासून सांगत आलो आहोत की हिंदू धर्म आर्य धर्म आहे आणि आर्य हे हिंदू आहेत. त्यामुळे द्रविडांनी स्वतःला हिंदू म्हणू नये असे मला वाटते. पेरियार नेहमी आर्यांना बाहेरचे मानत होते आणि आर्य समाजव्यवस्थेमुळे जातिव्यवस्थेचा उदय झाला होता असे त्यांचे मत होते. "आर्य ग्रंथांवरून असे दिसते की त्यांच्या जीवनात फक्त एकच उद्दिष्ट होतेः त्यांनी आरामात जगावे, तर समाजातील एका मोठ्या वर्गाने त्यांची आजन्म सेवा करावी." हिंदू ग्रंथांमध्ये शोषणाचा गौरव कसा केला गेला हे त्यांच्या लिखाणात वारंवार आलेले आहे. ते लिहितात, चातुर्वर्ण्य व्यवस्थेला कोण जबाबदार आहे? एका राष्ट्राचे हजारो जाती आणि वर्गांमध्ये विभाजन करण्यास जबाबदार कोण? आर्यांनी हे केले नाही का? आम्हाला अनेक वेगवेगळ्या गटांमध्ये विभागून, आमच्या परस्परसंवादावर मर्यादा घालून आणि प्रत्येक जातीसाठी वेगवेगळ्या भूमिका निश्चित करून त्यांनी आमच्या एकतेच्या भावनेला तडा दिला नाही का? आपल्या शातील लोक राष्ट्राचा विचार करत नाहीत आणि लोक एकमेकांची चिंता करत नाहीत त्याचे हेच कारण नाही का? आपण आर्य आणि परकीयांचे गुलाम झालो आहोत याची आपल्याला लाज वाटते." पेरियार यांना या दोन्ही गुलामगिरीतून मुक्ती हवी होती. त्यांना असे वाटत होते की, जर स्वातंत्र्य फक्त इंग्रजांपासून मिळणार असेल तर ते अपूर्ण असेल. हे तेव्हाच पूर्ण होईल जेव्हा द्रविडांना हिंदूंच्या





वर्णद्वेषातून मुक्तता मिळेल आणि त्यांचे शोषण होणार नाही. पेरियार यांच्या लिखाणातून तसेच त्यांच्या भाषणांमधून जातिव्यवस्थेबद्दल अनेक विचारप्रवर्तक मुद्दे मांडले गेले होते. पेरियार म्हणतात की, धर्माने जातिव्यवस्था क्रूर केली आहे. समाजाच्या या दुष्ट व्यवस्थेचे मूळ हिंदू धर्मात शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हिंदू धर्म आर्यांनी आणला आणि द्रविडांशी त्यांचे कधीच चांगले संबंध नव्हते आणि कधीच नसतील असा त्यांचा ठाम विश्वास होता. वांशिक श्रेष्ठत्वाची कल्पना पूर्णपणे काढून टाकली तरच दोघांमधील कोणताही अर्थपूर्ण संवाद शक्य आहे. दोघांमधील कलहाची बीजे संस्कृतीच्या आखाड्यात आधीच रुजली आहेत. त्यांनी यासंदर्भात रामायणाचा अनेक वेळा उल्लेख केला असून आर्यांचे वर्चस्व वाढवण्यासाठी आणि द्रविडांना अधोगतीकडे नेण्यासाठी या पुस्तकाचा उपयोग झाला, अशी त्यांची धारणा होती. पेरियार यांना अशा अपमानजनक कथांमागील षड्यंत्र उघड करायचे होते आणि ब्राह्मणेतरांनी अशा कथांवरविश्वास ठेवू नये, अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी हे अवघड काम आयुष्यभर केले. आयुष्याच्या शेवटपर्यंत ते सक्रिय राहिले. १९७० मध्ये वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी उन्माई (द ट्रुथ) हे नवीन द्विमासिक तामिळ भाषेत सुरू केले. या शीर्षकावरून त्यांचा सत्याचा आग्रह दिसून आला. विवेकवाद्यांना एकत्र करण्यासाठी त्यांनी बिगर राजकीय रॅशनलिस्ट फोरम; सुरू केला. त्यांनी मॉडर्न रॅशनलिस्ट हे इंग्रजी मासिक सुरू केले. पेरियार यांनी ८-९ डिसेंबर १९७३ रोजी थिडल, वेपेरी, मद्रास येथे सामाजिक संमेलने आयोजित केली होती ज्यात हजारो लोक उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये बोलताना पेरियार यांनी द्रविडवासियांना पुढे येऊन ब्राह्मण वर्चस्वाच्या विरोधात लढण्याचे आवाहन केले. पेरियार यांनी आयुष्यभर जातीवादी आणि जातीय भेदभावाविरुद्ध लढा चालू ठेवला. १९ डिसेंबर १९७३ रोजीपेरियार यांनी त्यागराज नगर येथे त्यांच्या आयुष्यातील शेवटचे भाषण केले आणि २४ डिसेंबर १९७३ रोजी त्यांचे निधन झाले. **(लेखकाच्या पेरियार रामासामी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथातून)**

## मानवी स्थलांतराची समस्या



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**विविध कारणास्तव आपले राहाते घर किंवा प्रदेश किंवा अगदी आपला स्वदेश सोडून इतर परक्या प्रदेशामध्ये वास्तव्यास जाणे हा प्रकार मनुष्यप्राण्यांमध्ये अगदी इतिहासपूर्व काळापासून होत आला आहे. शास्त्रीय परिभाषेमध्ये या प्रकारास 'स्थलांतर करणे' असे म्हणण्यात येते. स्थलांतर हा माणसाच्या आजवरच्या इतिहासात कायमच महत्त्वाचा घटक राहिला आहे. अवघ्या मानव जातीचा इतिहास हा स्थलांतराचा इतिहास राहिलेला आहे. म्हणजे, दीड-दोन लाख वर्षांपूर्वी आपला पूर्वज असलेल्या आदिमानवाने अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या इर्षेपायी गुहेबाहेर पाऊल टाकलं, ते आजही थांबलेले नाही. स्थलांतराची ही प्रक्रिया मानवाच्या जन्मापासून अव्याहत सुरूच आहे.**

आजवरच्या इतिहासात स्थलांतराच्या या अव्याहत प्रक्रियेला चालना देणारे, रोखणारे अनेक टप्पे येऊन गेले आहेत. म्हणजेच, साधारण दहा-एक हजार वर्षांपूर्वी जेव्हा भटके जगणे टाळून माणूस शेती करू लागला तेव्हा, टोळ्यांनी स्थलांतर करणारा माणूस काही काळापुरता स्थिरावला. मग दळणवळणाची साधने विकसित होत गेली, महासाथी, युद्धे, महापूरासारख्या आपत्ती कोसळत गेल्या तशी स्थलांतराची प्रक्रिया वेगाने पुढे सरकत गेली. युरोपात प्रबोधनाचे पर्व अवतरले. पाठोपाठ सरंजामशाही लयास जावून भांडवलशाही उदयास आली, औद्योगिक क्रांती झाली, तसे ग्रामीण ते शहरी असा स्थलांतराचा प्रवाह वेगवान झाला. एकोणीस आणि विसाव्या शतकात साम्राज्यवादी सत्तांच्या विस्तारवादी धोरणांनी सक्तीच्या स्थलांतराचा प्रवाह रुजवला केला. विसाव्या शतकाच्या प्रारंभी पहिले आणि दुसरे महायुद्ध, भारताची झालेली फाळणी या घटनांनी समूहांच्या स्थलांतराला धग दिली. पुढचा स्थलांतराचा टप्पा आखाती युद्ध आणि त्याला समांतर जागतिकीकरण, उदारीकरण या प्रक्रियांमुळे आला. मधल्या काळात हे विश्व जणू खेडे झाल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवले. आदीम काळापासून आजच्या कोरोना संकटापर्यंत माणसे सतत एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी जात राहिली आहेत. कधी संकटापासून दूर जाण्यासाठी तर कधी पोटाची खळगी भरण्यासाठी. या स्थलांतर करणाऱ्या माणसांशी तेथील मूळच्या लोकांसोबत झालेल्या संघर्षाच्या आणि सहकार्याच्या कहाण्यांनी माणसाचा इतिहास भरलेला आहे. आज एकविसाव्या शतकात, वाढलेला प्रवासाचा वेग आणि संपर्काची क्रांती यामुळे या स्थलातंराचे नवेनवे पैलू सामोरे येत आहेत. स्थलांतराचे हे गणित समजून घेतल्याशिवाय आता आपल्याला पुढे जाता येणेच अशक्य आहे. कोणत्याही स्थलांतराच्या अनेक बाजू असतात. राष्ट्र, भाषा, जात/जमात, श्रद्धा, अस्मिता, त्यांचे राजकारण आणि बाजारपेठेवर-अर्थकारणावर प्रभाव टाकणाऱ्या वेगवेगळ्या सामाजिक गुंतागुंती इत्यादी मुद्द्यांवर मूळचे आणि बाहेरचे यांच्यात होणारा संघर्ष आणि नंतरचे जुळवून घेणे या प्रक्रिया वर्षानुवर्षे चालणाऱ्या प्रक्रिया आहेत. अनेकदा समाजातील या स्थलांतराच्या, समाजात मिसळून जाण्याच्या किंवा जुळवून घेण्याच्या प्रक्रिया अनेकदा दुर्लक्षित केल्या जातात. रशिया युक्रेन युद्ध असो की वातावरण बदल असो कधी कुठे भुकंप तर कुठे नवनवीन आजार. पण यासर्वांचा प्रभाव स्थलांतरावर होतो. स्थलांतर हे स्थायी आणि अस्थायी असे दोन्हीही असू शकते. यामागे अनेक कारणे आहेत. युद्ध, असुरक्षा, क्लायमेट चेंज, रोजगार या सारख्या गंभीर समस्येमुळे अनेक लोक आपली रहीवासी जागा सोडून दूस-या ठिकाणी स्थलांतरीत होतात. पण जेव्हा ते दुस-या ठिकाणी पोहचतात त्यावेळी त्या ठिकाणचे लोकांना ते ओझे वाटू लागतात. २०२१ मध्ये जवळपास ५.९ कोटी लोकं स्थलांतरीत झाले होते मात्र हे लोकं कोण होते, हे समजून घेणेही तितकेच गरजेचे आहे. हे लोक ते होते की आपला देश सोडत दुस-या देशात स्थलांतरीत झाले किंवा बॉर्डर पार करुन दुस-या देशाच्या बॉर्डरवर राहायला गेले. कोरोना काळात अनेकांचा रोजगार दगावला. त्यामुळे अनेकांनी स्थलांतर केले. मोठ्या शहरातून लोक गावाकडे परतले. कोरोनाच्या काळातील झालेली स्थलांतरे आणि त्या स्थलांतरप्रक्रियेत झालेल्या कामगारवर्गाच्या व त्यांच्या लेकराबाळांना भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टा या वास्तवाला अधिक गडद करून गेल्या. या काळात लाखो स्थलांतरित मजूर, कामगार शेकडो-हजारो मैल रस्ते तुडवत आपापल्या गावी परतू लागल्याचे दृश्य या देशाने पाहिले. वाहतुकीच्या तुटपुंज्या व्यवथेमध्ये होत असलेल्या या स्थलांतराच्या कहाण्यांनी, काहींना थेट १९४७ च्या फाळणीच्या वेळी झालेल्या ऐतिहासिक स्थलांतराची आठवण झाली. स्वातंत्र्योत्तर भारताच्या आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच स्थलांतराची समस्या ही मोठी समस्या आहे याची किमान जाणीव इथल्या समाजाला आणि सरकारला झाली. याशिवाय कोरोनाचा धोका संपताच लोक पून्हा शहराकडे स्थलांतरीत होताना दिसत आहे.स्थलांतर ही एक गरज झालेली आहे. गावाकडचे लोकं शहरात स्थलांतरीत होत आहेत. सध्या जगाची अर्ध्याहून अधिक लोकसंख्या शहरी भागात राहते आणि येत्या २०५० पर्यंत हे प्रमाण दोन तृतीयांश किंवा ६६ टक्क्यांवर जाण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटनेच्या मते प्रत्येक तीस व्यक्तींमध्ये एक व्यक्ती स्थलांतरीत करत असतो. स्थलांतर ही अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या इर्षेतून स्फुरलेली म्हटली तर नैसर्गिक क्रिया आहे. मात्र गेल्या शतकभरातल्या देशोदेशींच्या नेत्यांनी केलेल्या शत्रूकेंद्री राजकारणामुळे ही प्रक्रिया समस्या बनलेली आहे. हे आंतरराष्ट्रीय स्थलांतरित नागरी क्षेत्रांतच राहतात. जागतिकीकरणाच्या या युगात भांडवल, तंत्रज्ञान, मालवाहतूक आणि सेवा व माणसे यांची वाहतूक किंवा स्थलांतर हा महत्त्वाचा भाग ठरला आहे. त्यामुळे नागरीकरण ही समाज, तसेच अर्थव्यवस्थांची परिवर्तनशील प्रक्रिया आहे. त्यामुळे शाश्वत शहरे आणि मानवी वहन या विषयांवर सर्वंकष आणि संतुलित दृष्टिकोनाची गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ग्राहक संरक्षणासाठी शासन कटिबद्ध



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**आपण भारताचा अमृत महोत्सव साजरा केला. आणि करतोय. गेल्या 75 वर्षांत भारताने अनेक क्षेत्रात प्रगती केलीआहे. मागे वळून पाहता 1947 पासून तो आज पावेतो ग्राहक संरक्षण याच्या बाबतीत कुठे आहोत त्यात कशी कशी प्रगती होत गेली व ग्राहक संस्था व शासन यांनी ग्राहकाची कुठलीही वस्तू खरेदी करताना, तसेच सेवा मिळताना काय काय उपलब्धी करून दिली आहे हे पाहणे तेवढेच महत्त्वाचे आहे.**

बऱ्याच प्रमाणात गैरव्यवहारला आळा बसला. शासनाचे पातळीवर ग्राहकांना न्याय मिळावा, तक्रार निवारण होण्यासाठी खालील प्रमाणे सक्षम व्यवस्था आहे. (१) राज्य आयोग राज्यात राज्य आयोगाची स्थापना दि.३१ ऑक्टोबर, १९८९ पासून करण्यात आली. या आयोगावर अध्यक्ष व पाच सदस्य काम करतात. यापैकी एक न्यायिक सदस्य व महिला सदस्य असणे आवश्यक आहे. राज्य आयोगाच्या अध्यक्षपदी उच्च न्यायालयाचे कार्यरत किंवा निवृत्त न्यायाधिशांची नेमणूक करण्यात येते. तसेच, न्यायिक सदस्य पदी कार्यरत/ निवृत्त जिल्हा न्यायाधिशांची तर सदस्य पदी ज्या व्यक्तीच्या जवळ कार्यकुशलता, सचोटी व प्राविण्य आहे व ज्यांना अर्थशास्त्र, कायदा, वाणिज्य, लेखाशास्त्र, उद्योग, सार्वजनिक व्यवहार किंवा प्रशासन यासंबंधीच्या समस्यांचे पुरेसे ज्ञान किंवा अनुभव आहे किंवा ज्यांनी त्या संबंधीची कार्यवाही करताना विशेष क्षमता दर्शविली आहे अशा व्यक्तींची नियुक्ती करण्यात येते. या दोन सदस्यांपैकी एक स्त्री सदस्य असणे आवश्यक आहे. राज्य आयोगाचे कार्यालय. मुंबई येथे आहे. सर्कीट बेंच (परिक्रमा खंडपीठ) राज्य आयोगासमोरील प्रलंबित प्रकरणांची संख्या विचारात घेऊन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे नागपूर व औरंगाबाद येथे सर्किट बरंच आहेत. (२) जिल्हा मंच (जिल्हा आयोग) जिल्हा मंचावर अध्यक्ष व दोन सदस्यांची नेमणूक करण्यात येते. जिल्हा मंचाच्या अध्यक्ष पदी कार्यरत जिल्हा न्यायाधिश किंवा निवृत्त जिल्हा न्यायाधीश किंवा जिल्हा न्यायाधीश होण्याची अर्हता ज्या व्यक्तीकडे असेल अशा व्यक्तीची नियुक्ती करण्यात येते. मंचावरील सदस्यांची राज्य आयोगाच्या सदस्याप्रमाणेच पात्रता नमूद केली आहे. राज्यात प्रत्येक जिल्हयासाठी स्वतंत्र मंचाची स्थापना करण्यात आली आहे. त्याशिवाय मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे व मुंबई उपनगर येथे ग्राहकांच्या तक्रारींचे प्रमाण जास्त असल्यामुळे या जिल्हयामध्ये प्रत्येकी एक असे एकूण पाच अतिरिक्त जिल्हा मंच स्थापन करण्यात आले आहेत. जिल्हयाच्या मुख्यालयामध्ये हे मंच कार्यरत आहेत.

राज्य व जिल्हा मंचाची अधिकारीता

रूपये २० लाख ते रूपये एक कोटी पर्यंतच्या किंमतीचे दावे राज्य आयोगाकडून हाताळण्यात येतात तसेच जिल्हा मंचानी दिलेल्या निर्णयाविरूध्दच्या अपिलांचा निवाडा राज्य आयोगास करावा लागतो.

(३) राज्यस्तरीय ग्राहक संरक्षण परिषद

महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (सुधारणा) नियम २००४ अंतर्गत राज्यस्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात येते. राज्यस्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेची सदस्य संख्या ३८ असून ग्राहक संरक्षणाशी संबंधित असलेल्या विविध शासकीय अधिकारी तसेच ग्राहकांच्या हिताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांची परिषदेवर निवड केली जाते. राज्यस्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेचे मा.मंत्री, ग्राहक संरक्षण हे अध्यक्ष असून मा.राज्यमंत्री, ग्राहक संरक्षण हे उपाध्यक्ष आहेत. या परिषदेचा कालावधी ३ वर्षाचा विहित करण्यात आला आहे.

(४) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद

जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (सुधारणा) नियम, २००४ नुसार जिल्हास्तरीय ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करण्यात येत असून जिल्हा ग्राहक संरक्षण परिषेदवर वेगवेगळया स्तरावरील ४० शासकीय व अशासकीय सदस्यांची निवड केली जाते. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची मुदत तीन वर्षे इतकी विहित करण्यात आली आहे.

(५) ग्राहक कल्याण सल्लागार समिती

राज्यात ग्राहक चळवळीला प्रोत्साहन देऊन ही चळवळ ग्रामीण – दुर्गम भागात पसरविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत शासनाला सल्ला देण्यासाठी एक सदस्यीय महाराष्ट्र ग्राहक कल्याण सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे.

(६) केंद्रात केंद्रीय ग्राहक संरक्षण परिषद, आणि राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग अशी व्यवस्था आहे.

(७) याव्यतिरिक्त ग्राहकांच्या हक्काबाबत "जागो ग्राहक जागो" ही जनजागृती, मोहीम राबवली जात आहे.यात ग्राहक आपली तक्रार नोंदवू शकतात. त्यासाठी सरकारी हेल्पलाईन आहे.१८००-११-४००० यस टोल फ्री नंबरवर ग्राहक तक्रार नोंदवू शकतात.विजपूरवठा,एल पी जी,बँका, विमा,टपाल कुरियर सेवा,पाणीपुरवठा, शिक्षण,वैद्यकीय सेवा,वाहन विक्री, क्रेडिट कार्ड, अशा सेवांचे बाबतीत त्रास होत असल्यास, झाला असल्यास दाद मागता येते.राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन खुपच परिणामकारक ठरली आहे.

८) कंझ्युमर क्लब :- केंद्र शासनाचे योजना अंतर्गत विद्यार्थांचे ग्राहक प्रबोधना करता शाळा,कॉंलेज मधून कंझ्युमर क्लब स्थापन करण्याची केंद्र शासनाची योजना आहे.ही योजना १००%शासन पुरस्कृत आहे. त्यासाठी केंद्र सरकार कडून



**भाग : २**

अर्थसहाय्य मंजूर होते.

(९) ग्राहक हिताचे संरक्षण व्हावे हा वजनमाप यंत्रणेचा उद्देश असून त्यासाठी या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या व्यापारी, खरेदी, विक्री करणारे औद्योगिक संस्था यांना अचानक भेट देऊन वेळच्या वेळी तपासण्या केल्या जातात. त्यांच्याकडे वापरात व ताब्यात असलेली वजने, मापे, तोलन व मापन उपकरणे याची तपासणी व मुद्रांकनाचे काम केले जाते.तसेच माल कमी देणे, खरेदीच्या वेळी ठरलेल्या मोजमापापेक्षा फसवणुकीने जास्तीचा माल घेणे यासारख्या वजनमापे कायद्याअंतर्गत तरतुदीच्या भंगाबद्दल संबंधीतावर गुन्हे दाखल केले जातात.

ग्राहक या नात्याने, नागरिकाने आपली फसवणूक होणार नाही यासाठी दक्ष राहिले पाहिजे.

या यंत्रणेमार्फत वैधमापन कायदा २००९अंतर्गत अंमलबजावणी करण्यात येते.

एखादी वस्तू जर पॅकेटमध्ये बंद असेल तर त्या पॅकेटवर ६ गोष्टी असणे कायद्याने बंधनकारक आहे. वस्तूच्या मॅन्युफॅक्चरचे नाव पॅकेटवर असायला पाहिजे. त्या पॅकेट मध्ये काय आहे ?

वजन किती आहे? युनिट असेल तर किती युनिटस् आहे? पॅकेटस् वर निर्मितीचा महिना व वर्ष. अधिकतम विक्री किंमत...(सर्व करासहित) कस्टमर केअर क्रमांक. एखादीही माहिती वस्तूवर नमूद नसेल तर तो कायद्याने गुन्हा ठरतो आणि गुन्ह्यासाठी कायद्यात शिक्षा नमूद केली आहे.

(१०) सोन्याच्या शुद्धतेवर आपण नेहमीच साशंक असतो. सोने खरेदीवेळी अनेकांची गुणवत्तेत फसवणूकही केली जाते. त्यामुळे शुद्ध सोने कसं ओळखायचे असा अनेकांना प्रश्न पडतो. सोन्याच्या खरेदीत ग्राहकांसोबत कोणत्याही प्रकारची फसवणूक होऊ नये यासाठी सरकारने अनेक नियम बनविले आहेत. कोणीही हॉलमार्किंगशिवाय सोन्याची विक्री करु शकत नाही. मात्र हॉलमार्किंग नेमकं काय? सोन्याची शुद्धता ओळखण्यासाठी त्याचा कसा फायदा होतो? याचीही आपल्याला माहिती हवी. सोन्यासाठी हॉलमार्क हे त्याच्या शुद्धतेचे वैशिष्ट्य आहे. भारतीय मानक ब्यूरो अर्थात बीआयएसद्वारे याची निश्चितता केली जाते. हे सोन्याच्या गुणवत्तेची पातळी तपासते. तसेच दागिने किंवा सोन्याच्या तपासणीसाठी या प्रयोगशाळांना परवाना दिला जातो. सोने आणि दागिन्यावर बीआयएसची हॉलमार्किंग असणे आवश्यक असते. त्यामुळे सोने खरेदी करताना हॉलमार्क आहे की नाही याची निश्चित बघायला हवे. सोन्याच्या हॉलमार्कमध्ये बीआयएसचे त्रिकोणी चिन्ह असते. तसेच, त्यावर हॉलमार्किंग केंद्राची एक खूण असते. त्यासोबतच सोन्याची शुद्धता, तो सोन्याचा दागिना कधी बनवला आहे, हे देखील त्यावर लिहिलेले असते. प्रत्येक दागिन्यावर त्याची शुद्धता लिहिलेली असते. 99 कॅरेट शुद्ध सोन्यावर 999 लिहिलेले आहे. तर 22 कॅरेटच्या दागिन्यांवर 916 आणि 21 कॅरेट सोन्याचे 875 असे लिहिलेले असते. या व्यतिरिक्त 18 कॅरेटच्या दागिन्यांवर 750 आणि 14 कॅरेट दागिन्यांवर 585 असे लिहिलेले असते. जर एखाद्या व्यापाऱ्याने हॉलमार्कऐवजी स्वस्त दागिने देण्याची ऑफर दिली असेल तर ती ऑफर स्विकारु नका. तज्ञांच्या मते, प्रत्येक दागिन्यांवर हॉलमार्क करण्याची किंमत अल्प असते. म्हणजेच, हॉलमार्क केलेले आणि हॉलमार्क नसलेल्या दागिन्यांच्या किंमतीत सहसा कोणताही फरक नसतो. पण हॉलमार्क नसलेल्या दागिन्यांमध्ये सोन्याच्या शुद्धतेबाबत गडबड असू शकते. फसवणूक होते. कोणतेही दागिने घेताना त्याच्या शुद्धतेचे प्रमाणपत्र आवर्जून घ्या. त्यात सोन्याची गुणवत्ता लिहीली असते. हॉलमार्क असलेले दागिने खरेदी करण्याचे बरेच फायदे आहेत. त्यातील एक म्हणजे सोन्याच्या शुद्धतेबद्दल. तसेच जर तुम्ही दागदागिने विकायला गेलात तर त्यामध्ये कोणतीही घट( डेप्रिसिएशन कॉस्ट) कमी केली जात नाही. म्हणजेच तुम्हाला सोन्याची योग्य किंमत मिळते.

** सुधारित ग्राहक संरक्षण विधेयक ३० जुलै २०१९ लोकसभेत, व ६ऑगस्ट २०१९ राज्यसभेत मंजूर झाले.९ऑगस्ट २०रोजी राष्ट्रपतींची सही झाल्यावर २० जुलै रोजी ते लागू झाले. आता जिल्हा आयोग,व राज्य आयोग अशी रचना आहे,जिल्ह्यात एक कोटी पर्यत, राज्य दहा कोटी पर्यत, त्यावरील केंद्रीय आयोगां कडे दावे असतील. नवीन कायद्यात ऑनलाईन,व टेलिशॉपींग कंपन्यांचा समावेश आहे. खाद्यपदार्थ व पेये यात भेसळ असलेस तुरूंगवास. दंडाची तरतूद आहे.तक्रार कुठेही दाखल करता येते. दिशाभूल करणाऱ्या, चुकीच्या जाहिराती, देणारे, प्रसारित करणारांना दंड करण्याचा आयोगाला अधिकार आहे.दोनवर्ष तुरुंगवास पन्नासलाख दंडाची तरतूद आहे.

.अजूनही बर्याचशा तरतुदी आहेत.

शासनाचे पातळीवर जरी व्यवस्था असली तरी ग्राहकांनीही बजारपेठेत सावधपणे रहायला हवे. हक्का बरोबरच कर्तव्ये आणि जबाबदारीचे भान ठेवायला हवे.हे ही लक्षात ठेवावे.

* बाजारपेठेत स्पर्धा ही असणारच. फसव्या जाहिरातीला बळी पडू नये.बक्षिसे, लकीड्रॉं.
* ऑंना लाईन खरेदीवर धमाका सेल असतो. दोषयुक्त वस्तूंची शक्यता असते.
* खरेदी केलेल्या वस्तूंचे बिल घेणे आवश्यक आहे. दोषयुक्त मालाची तक्रार त्याशिवाय करु शकत नाही.
* एम.आर.पी.(मॅंक्झीमम रिटेल प्राइज) पेक्षा जास्त किंमत देऊ नका.
* वस्तूंची मुदत (एक्सपायरी डेट) तपासा.ती संपली असेल तर नकार द्या.असा वापर हानिकारक ठरु शकतो.
* सोने, चांदी, खाद्यपदार्थ,शेतीउत्पादने घेतांना, हॉंलमार्क, अँगमार्क बघा.
* पेट्रोल भरताना मीटर बघा. शुध्दतेविषयी शंका असेल तर तहसीलदार, पुरवठा अधिकारींकडे तक्रार करा.
* ऑंनलाईन खाद्य पदार्थ मागवतांना, पदार्थ खराब असतील तर ताबडतोब तक्रार करा.

अशा प्रकारे ग्राहकाने सावधगिरीने खरेदी करावी. आपल्या सहकार्या साठी शासन आपल्या पाठीशी आहे.आपली योग्य तक्रार करण्यास घाबरु नये.

जाता जाता एक गोष्ट आवर्जून सांगावी वाटते. शासनाचे पातळीवर दरवर्षी, जागतिक ग्राहक दिन, राष्ट्रीय ग्राहक दिन साजरे होतात.त्यात औपचारिकता आली आहे. मरगळ आहे.ठराविक ठिकाणी उत्साह असतो. कार्यक्रमास उपस्थिती नसते. प्रसार, प्रचार नसतो. एक कार्यक्रम आटोपून अहवाल, फोटो वरती पाठवायचे, बास एवढेच. हे दोनही दिवस ग्राहक चळवळ व्हायला हवी. स्थानिक ग्राहक संस्थाशी संपर्क हवा. ग्राहकांची उपस्थिती कार्यक्रमास हवी हे महत्वाचे आहे. विविध खात्याचे अधिकारी कार्यक्रमास उपस्थित हवे.

दुसरे असे की बऱ्याचदा जिल्हा तक्रार निवारण आयोग,राज्य आयोगावरिल सदस्य नेमणुका होत नाही, वा पदे रिक्त असतात, त्याकडे शासनाने लक्ष द्यावे एवढेच. शेवटी ग्राहकशक्ति + न्यायशक्ति +दंडशक्ति '=शोषणमुक्ती असेच समीकरण आहे.

# अर्ध्यावरती डाव मोडला



भानुदास धोत्रे
संपर्क क्र. 7972625086

आधुनिक केसरी

**तब्बल पंचवीस वर्षानंतरच्या भेटीअंती, समीरणं आपलं मन मोकळं केलं. सांगतांना त्याच्या दोन्ही डोळ्याच्या कडा पानावल्या होत्या. अधून मधून आसवांची टिपेही गळत होतीच. हुंदके आवरता आवरत नव्हते. तो मध्ये-मध्ये स्वतःला सावरण्याचा खूप प्रयत्न करी. पण भावनांचा आवेगच एवढा तीव्र होता की, त्याला त्या रोखणं शक्य होत नव्हतं. काही वेळातच दाटून आलेल्या भावनांचं संपूर्ण वीरेचन झालं. आभाळात गच्च दाटून आलेला एखादा कळाकुट्ट मेघुट धो-धो कोसळून आभाळ निरभ्र व्हावं, तसं तो आतून पुरता मोकळा झाला होता. त्याला आता अगदी हलकं हलकसं वाटत होतं. समीर आईवडिलांना एकटाच. तीन बहिणी, त्याही चांगल्या घरी दिलेल्या.**

वडील महसूलात चांगल्या हुद्यावर. गावाकडं शेतीबाडी. एकंदरीत मध्यमवर्गीय म्हणावं असा कौटुंबिक वारसा लाभलेला. गडी दिसायला राजबिंडा. अगदी सिनेमातला जॉकी श्राफ शोभावा असा लोभस. कॉलेजात असतांना स्वप्नाची अन त्याची ओळख झाली. स्वप्नाही दिसायला साजरी. शिक्षणात हुशार. पण तिच्या घरची परिस्थिती मात्र जेमतेमच. पुढं कॉलेजचं गॅदरिंग, ट्रिप, एन.एस.एस.कॅम्प, यानिमित्त भेटीगाठी वाढत गेल्या. समीर आणि स्वप्ना नकळत एकमेकांच्या जवळ ओढले गेले, आणि प्रेमात पडले. आता जगायचं तर सोबत अन मारायचं तेही सोबतच. अशा आणाभाका घेऊन कॉलेजचे, त्यांचे ते दिवस हळू हळू पुढे सरकत होते. पुढे आणायासे जिल्हापरिषदेत क्लरीकलच्या जागा निघाल्या. समीरचा टायपिंगचा कोर्स झालेला होताच. ग्रॅज्युएशनलाही डिस्टिंगशन असल्यामुळं सलेक्शन अगदी पक्क होतं. बांधलेल्या अंदाजाप्रमाणे समीरचं जिल्हा परिषदेत क्लार्क म्हणून सलेक्शन झालंही. पुढच्या आठ सहा महिण्याच्या फरकानं स्वप्नालाही नर्स म्हणून जिल्हा रुग्णालयात नोकरी मिळाली. दोघेही आता आपापल्या पायावर स्वतंत्र वृत्तीने उभे राहिले होते.

स्वप्ना आणि समीरच्या प्रेमाची कुण कुण, एव्हाना समीरच्या आईवडिलांच्या कानावर हस्तेपरहस्ते गेली होतीच. वडिलांनी एकांतात त्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण तो फारसे काही ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. हे लक्षात आल्यावर त्यांनी जास्त आढेओढे न घेता त्या दोघांना लग्नाची परवानगी देऊन टाकली. दोघांनीही कोर्ट मॅरेज करून जिल्ह्याच्या ठिकानी नवा संसार थाटला. दोघांनाही नोकरी. तीही जिल्ह्याच्या ठिकाणी. समीरला जिल्हा परिषदेचं क्वार्टरही मिळालं. स्वप्नाची ड्युटीही जिल्हा रुग्णालयातच. त्यामुळं कुठलीही ओढातान नव्हतीच अगदी. सारं काही सुरळीत चाललं होतं.

हळू हळू त्यांची संसारवेल बहरू लागली. प्रेमाच्या नाजूक नात्याला विवाहाच्या रूपानं मूर्त स्वरूप आलं. समीर अगदीच हळवा. तो स्वप्नाचे हवे नको ते सर्व लाड पूरवीत असे. वीकएंडला मोती बागेत फिरायला घेऊन जाई. कधी शॉपिंगला घेऊन जाई. स्वप्नाही तिच्या परीने समीरचं मन जपण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असे. त्याच्या आवडी निवडी. त्याच्या खाण्या पिण्याच्या, डब्ब्याच्या बाबतीत तर ती खुपच जागरूक असे. वर्षभरानंतर त्यांच्या संसारवेलीला "सोनूच्या" रूपानं सुंदर फळंही लगडलं. त्या जोडीला गोंडस असं पुत्ररत्न प्राप्त झालं. घरात खुशीचा माहोल मावेना. चहुंकडे आनंदी आनंद. दुधात साखर पडावी असा दुग्ध शर्करायोग. समीरचे बाबा नुकतेच महसूल खात्यातून सेवानिवृत्त झाले होते. समीर हा त्यांचा एकुलता एक लाडका मुलगा. त्यामुळे सेवानिवृत्ती नंतर आई बाबांनी माझ्या सोबत राहायला यावं असं समीरला वाटणं साहजिकच. तसा विचार त्यानं स्वप्नाजवळ भीत भितच बोलून दाखवला. तीनंही त्याच्या सुरात सूर मिसळून ती त्याला हो म्हणाली. समीरला आकाश ठेंगणं झालं. त्याला वाटलं आपली चॉईस खरी उतरली. खरं तर आपलं लव्ह मॅरेज. आई बाबांना घरी आणायला स्वप्ना परवानगी देईल की नाही याबद्दल तो मनात थोडा साशंक होता. कारण बाबांनी सुरुवातीला त्यांच्या लग्नाला परवानगी नाकारली होती. पण ह्या दोघांचं "एक दुजे के लिए" पक्क आहे असं समजल्यामुळे, सर्वच इलाज खुंटले. म्हणून शेवटी नाईलाजाने का होईना, परवानगी देऊन मोकळेही झाले होते. दरम्याच्या काळात कांचननगर मध्ये समीर आणि स्वप्नाने चांगला दोन हजार स्क्वेअर फुटाचा टूमदार बंगला बांधून पूर्ण केला होता. समीरच्या बाबांची सेवानिवृत्ती आणि ह्यांच्या बंगल्याचा गृहप्रवेश असा सुवर्ण योग जुळून आला होता. समीर, स्वप्ना, सोनू, आई, बाबा ह्या सर्वच जणांनी वास्तुशांतीच्या दिवशी सर्व आप्तेष्ठाच्या साक्षीने गृहप्रवेश पूर्ण केला. समीर आणि स्वप्ना ह्या दोघांनाही सरकारी नोकऱ्या. त्यामुळे ऑफिसची वेळ गाठतांना त्यांची सतत दमछाक व्हायची. लहानग्या सोनूला सांभाळण्याचा प्रश्न निर्माण व्हायचा. आता आई बाबांच्या येण्यानं तो प्रश्न कायमस्वरूपी निकालात निघाला होता. लहानग्या बाळाकडे लक्ष द्यायला आता आई आणि बाबा घरी होते. त्यामुळे समीर आणि स्वप्ना निश्चिन्त झाले होते. घरात गोकुळ नांदत होतं. कुठंच कशाची कमी भासत नव्हती. दिवसं आनंदात मागे पडत होते. बाळही हळू हळू दिवसांगणिक मोठं होत होतं.

स्वप्ना तशी जिद्दी मुलगी होती. सरकारी हॉस्पिटल मधील नर्सची नोकरी. लहानग्या बाळाचा सांभाळ आणि घरातील चार चौघाच्या स्वयंपाक पाण्यापासून ते कपडालत्ता, भांडी धुण्यापर्यंत सर्व करीत ती अभ्यासाला वेळ काढीत असे. एम.पी.एस.सी.ची परीक्षा देऊन अधिकारी होण्याचं कॉलेजात पाहिलेलं स्वप्न तीला पूर्ण करायचं होतं. एक दोन अटेम्ट देऊन पहिले. पण त्यात तीला यश आलं नाही. अपयशानं ती खचलीही नाही. उलट ती जिद्दीने अभ्यासाला लागली. यावेळी मात्र कोणत्याही परिस्थितीत परीक्षा पास व्हायचंच असा मनाशी हिय्या केला. तीनं शेवटचा अटेम्ट दिला आणि काय आश्चर्य....!! आरोग्य अधिकारी वर्ग दोन पदी तिची एम.पी.एस.सी मार्फत नियुक्ती झाली. धुळ्याला तीला पोस्टिंग मिळाली. दरम्यानच्या काळात सोनू चांगला मोठा झाला होता. तो आता शाळेत जाऊ लागला होता. समीर आणि स्वप्नावरील त्याचं अवलंबित्व थोडं कमी झालं होतं. स्वप्नानेही धुळे इथे वर्ग दोन आरोग्य अधिकारी पद जॉईन केलं होतं. समीरला वेळ मिळंल तसं तो स्वप्नाला भेटायला जात असे. कधी कधी शक्य झाल्यास स्वप्नाही समीरला भेटायला येत असे. असं त्यांचं ऍडजेस्टमेन्ट लाईफ नव्यानच सुरु झालं होतं. बायको वर्ग दोन ची अधिकारी झाल्याचा आनंद समीरच्या गगनात मावत नसायचा. स्वप्नाबरोबर लग्न करून संसार थाटल्याचा त्याला मनोमनी हर्ष वाटत असे. अन निर्णय सार्थकी लागल्याचं समाधानही. पण कालांतरानं दिवस पालटले. जेंव्हा केव्हा स्वप्ना कुटुंबाला भेटायला म्हणून घरी यायची, तेंव्हा तिचे आईबाबावरून समीर सोबत हळू हळू खटके उडायला सुरुवात झाली. समीर मात्र तरीही थोडं सबुरीनं घ्यायचा, तीला समजावून सांगायचा. पण कधी कधी तिचा हट्ट हा ऐकण्यापलीकडचा असायचा. समीरला मात्र इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती झाली होती. आई वडिलांची बाजू घ्यावी की पत्नीची, अशी द्विधा परिस्थिती त्याच्या समोर अचानक उभी राही. त्यावेळी तो अगदी दिग्मूढ होऊन जात असे. काय करावे हे त्याला क्षणभर सुचत नसे. पूर्वीचा स्वप्नाचा स्वभाव आणि अधिकारी पदावर आरुढ झाल्यानंतरचा स्वभाव यात त्याला जमीन अस्मानचा फरक दिसू लागला. तो त्याच्याच तंद्रित तल्लीन असायचा. बायकोलाही दुखावता येत नसे अन आई बाबांनाही अडचण सांगता येत नसे. समीर अन स्वप्नाच्या नात्यातलं बिनसलेपण कधी कधी आई बाबांच्या लक्षात यायचं. पण असतील नवरा बायकोचे रुसवे फुगवे म्हणून ते त्याकडे दुर्लक्ष करायचे. पण हळू हळू स्वप्नाची हिम्मत चांगलीच वाढत गेली अन आई बाबांनाही ती टाकून पाडून बोलू लागली. तेंव्हा कुठं त्यांच्या लक्षात आलं की स्वप्नाचा अबोला, तिच्या वागण्यातला बदल हा नवरा बायकोच्या नात्यापुरताच मर्यादित नसून आम्हा उभयतांच्या घरातील असण्याशी त्याचा थेट संबंध आहे. समीरचे आई बाबा चांगलेच करारी. त्या उभायतांनी आपलं अख्ख आयुष्य अगदी उत्तम रीतीनं आनंदात व्यथित केलेलं.

**क्रमशः**

# जिल्ह्यात ग्रामपंचायत निवडणुका निकाल जाहीर

## विजयी उमेदवारांचा गुलाल उधळून जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणूक साठी ११८ ग्रामपंचायत साठी घेण्यात आलेल्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. जेलरोड या ठिकाणी मतमोजणी होत असल्याने संपूर्ण परिसरात गुलाल उधळून जल्लोष केला. हो काही ठिकाणी निराशा दिसून आली. या निकालातून जिल्ह्यात भाजपाची सरशी दिसत असली तरी महाविकास आघाडीनेही तगडी फाईट दिली आहे. विशेषतः धुळे तालुका आणि शिंदखेडयातून धक्कादायक निकाल हाती आहेत. या दोन्ही तालुक्यांमध्ये महाविकास आघाडीने भाजपच्या मातब्बरांना जबर धक्का दिला. धुळे तालुक्यात आ. कुणाल पाटील यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीने भाजपाला घायाळ केले. तर शिंदखेड्यात आ. जयकुमार रावल याचा बोलबाला दिसून आला सर्वांचे लक्ष लागून असलेल्या शिंदे गटाच्या शिवसेनेनेही जोरदार मुसंडी मारूत ठाकरे गटाच्या जागा बळकावल्यात. तर ठाकरे गटाच्या शिवसेनेला चमकदार कामगिरी करण्यात म्हणावे तसे यश आलेले नाही. शिरपूरात आ. अमरिशमाईंनी एकतर्फी विजयश्री खेचून आणली. तर साक्रीत शिंदे गटासह अपक्ष उमेदवारांचाही जोर दिसला. जिल्ह्यातील मुदत संपलेल्या १२८ ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया सुरु होती . त्यात धुळे तालुक्यातील ३३ साक्री तालुक्यातील ५५. शिंदखेडा तालुक्यातील २३ तर शिरपूर तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींचा समावेश होता, पैकी दहा ग्रामपंचायती बिनविरोध झाल्याने उर्वरित १०८ ग्रामपंचायतीसाठी रविवारी मतदान प्रक्रिया पार पडली. त्यात एकूण ७६.६२ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर आज सकाळी १० वाजेला मतमोजणीला सुखात झाली त्यासाठी धुळे शहरातील शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयात



व्यवस्था करण्यात आली होती. मतमोजणीच्या ठिकाणी समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. विजयी उमेदवाराच्या नावाची घोषणा होताच समर्थक व विजयी उमेदवार गुलाल उधळून जल्लोष करीत होते ... भाजप व मतमोजणीवेळी सुरवातीपासूनच महविकास आघाडीच्या उमेदवारांमध्ये मध्ये रस्सीखेच सुरु होती. धुळे तालुक्यातील फागणे, बोरकुड, नगाव आदी ग्रामपंचायतीच्या निकालाकडे साऱ्यांचे लक्ष लागून होते. मतमोजणीला सुरवात झाल्यानंतर केंद्राच्या ठिकाणी समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. तालुक्यातील तीन ग्रामपंचायती यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या आमपंचायतीचे निकाल जाहीर झाल्यानंतर भाजप महाविकास आघाडी, शिंदे गट, ठाकरे शिवसेनेकडून दावे - प्रतिदावे केले जात आहेत. धुळे तालुक्यातील ३३ पैकी १७ जागांवर विजय मिळविल्याचा दावा भाजपाने केला आहे. तर महाविकास आघाडीने २३ जागांवर आपला दावा केला आहे . तसेच पाच ग्रामपंचायतींवर आपले वर्चस्व असल्याचा दावा शिंदे बटाने केला आहे शिरपूर तालुक्यातील ग्रामपंचायतींवर आ . अमरिशभाई पटेल यांचा करिष्मा कायम दिसून आला. निकालानंतर विजयी उमेदवारांनी गुलालाची उधळण करत एकच जल्लोष केला. मतमोजणी केंद्राला यात्रेचे स्वरुप आले होते. साक्रीतही मतमोजणी केंद्राबाहेर समर्थकांनी मोठी गर्दी केली होती.काही समर्थकांनी हुल्लडबाजी केल्याने पोलीसांनी त्यांना सौम्य लाठीमार केला. दरम्यान, मतदान केंद्राबाहेर विजयी उमेदवारांची गुलालाची उधळण केल्याने रस्त्यावर गुलालाचा खच पडला होता. मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# सिल्लोड तालुक्यातील १८ पैकी १३ ग्रा.पं.वर सत्तार यांचे वर्चस्व



आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या पार पडलेल्या निवडणुकीत कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी एकहाती वर्चस्व राखत १८ पैकी १३ ग्रामपंचायतीवर बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) चा झेंडा फडकावला.तर ४ ग्रामपंचायत भाजपाच्या ताब्यात गेली तथा एका ग्रामपंचायत वर अपक्षांची सत्ता आली त्यावर भाजपाने दावा केलेला असल्याने अशाप्रकारे भाजपा ५ ठिकाणी निवडून सत्तेत आले आहे. भाजपाचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर मोठे यांनी ही आपल्या निल्लोड गटात वर्चस्व राखत दोन ग्रामपंचायतीवर भाजपाचा झेंडा फडकावला. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच ज्ञानेश्वर मोठे यांच्या गाव बोरगाव कासारी सहीत निल्लोड सर्कल मधील भाजपाच्या अनेक जुन्या व मोटे यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांना फोडत शिंदे गटात प्रवेश देऊन अब्दुल सत्तार यांनी ज्ञानेश्वर मोटेंना शह देण्याचा प्रयत्न केला होता.पण ज्ञानेश्वर मोटे यानी निकालात आपले वर्चस्व सिद्ध केले तथा निल्लोड येथे विलास पुर्णाजी आहेर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवत अब्दुल सत्तारांना ज्ञानेश्वर मोटेंनी शह देत उत्तम माणिकराव शिंदे यांना शिवसेनेतून भाजपात आणुन सरपंचपदी विराजमान केले. भाजपाकडुन प्रदेश चिटणीस इद्रीस मुल्तानी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुरेश बनकर,माजी पंचायत समिती सभापती अशोक दादा गरुड,दिलीप दाणेकर,सुनील मिरकर, आदींनी निवडणुकीत भाजपाच्या प्रचाराची धुरा सांभाळली. तरी अब्दुल सत्तार यांनी या निवडणुकीत मुसंड मारली. तालुक्यात प्रत्येक ठिकाणी अशाच चुरशीच्या च्या लढती पाहायला मिळाल्या, अशी माहिती बबलूशेट सोयगाव यांनी बोलताना सांगितले.



# कन्नड तालुक्यात मतमोजणी प्रक्रिया शांततेत

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील 51 ग्रामपंचायत पैकी तीन ग्रामपंचायत या बिनविरोध झाल्या असून 48 ग्रामपंचायत मतमोजणी छत्रपती शिवाजी कॉलेज येथे पार पडली असून यामध्ये मेगा व गराडा सरपंच पदाच्या उमेदवाराचे मतदान सम समान असल्याने सर्वांचा व उमेदवाराचा ही जीवनाला लागला होता मात्र निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन विधाते, तहसीलदार संजय वारकड, मोनाली सोनवणे यांच्या उपस्थितीमध्ये लहान मुलाच्या हातून चिठ्ठी उचलून लकी उमेदवार घोषित करण्यात आला यावेळी सर्व शासकीय विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांची मतमोजणी बुथवर उपस्थिती होती.

# शेवगाव तालुक्यातील 10 ग्रामपंचायतीवर महिलाराज

आधुनिक केसरी न्यूज

**निलकंठ कराड**

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील 12 ग्रामपंचायतींचा आज फैसला झाला. मतमोजणीनंतर विजयी उमेदवारांनी एकच जल्लोष केला.
गावनिहाय विजयी उमेदवार व त्यांना पडलेली मते पुढील प्रमाणे-
1) सुलतानपूर- डॉ. सविता विजय फलके (सरपंच, 807), सदस्य- मच्छिंद्र एकनाथ डोईफोडे (242), सविता अशोक शिंदे (238), सुवर्णा गणेश फलके (बिनविरोध), धनंजय सुरेश फलके (259), रविंद्र किशोर फलके (257), सारीका रामदास वाघमारे (बिनविरोध), अमर शेषराव जाधव (178), कविता शिरीष काळे (183) व सुमन बाळासाहेब मरकड (181)
2) अमरापूर - आशा बाळासाहेब गरड (सरपंच, 672), सदस्य- मुस्तकिम युनुस शेख (276), समीर रफीक शेख (242), आशा बाबासाहेब गरड (279), गणेश शिवाजी बोरुडे (232), मनिषा दीपक क्षीरसागर (320), मनिषा रमेश खैरे (191), राम दत्तात्रय पोटफोडे (164), शोभा बाळासाहेब सुसे (223), सोमेश्वर अशोक खैरे (322), माया ज्ञानेश्वर म्हस्के (276), चंदाबाई विक्रम खैरे (322). 3) रांजणी - काकासाहेब मुरलीधर घुले (सरपंच, 695), सदस्य- सोमनाथ भाऊसाहेब कर्डिले (254), योगेश्वर हरिभाऊ गवळी (222), सुरेखा संभाजी घुले (245), परशुराम रघुनाथ पवार (259), कमलबाई देवदत्त गायकवाड (277), सविता कैलास मोरे (255), अरुण केशव थोरात (184), अंजना संभाजी वाल्हेकर (217), शितल उद्धव चव्हाण (205).
4) भायगाव - मनिषा राजेंद्र आढाव (सरपंच, 695), सदस्य- अशोक प्रभाकर देशपांडे (241), शांताबाई प्रकाश सौदागर (266), शोभा रामदास तांभोरे (303), सुभाष सोना सौदागर (288), दिपाली अनिल लांडे (305), आशा एकनाथ लांडे (286), विठ्ठल घनश्याम पालवे (261), सुरज खंडेराव देशपांडे (256), नर्मदा मोहन जगधने (230) 5) खामगाव - विद्या अरुण बडधे (सरपंच, 386), सदस्य- विजय बबन तुजारे (136), दिगंबर भगवान बडधे (135), मिराबाई गजेंद्र घोलप (138), मोसिम आजमोद्दीन पटेल (116), आयशा फिरोज काझी (119), आशा कैलास जाधव (170), उषा सुभाष बडधे (178). 6) जोहरापूर - स्नेहल रोहन लांडे (सरपंच, 712), सदस्य- साहेबराव विश्वनाथ कुसाटे (482), हिराबाई शंकर देवढे (465), मुक्ता महादेव ढगे (450), अनिल श्रीराम अढागळे (226), शिवाजी सहदेव खेडकर (258), शोभा राजेंद्र पालवे (215), विष्णू निवृत्ती उगलमुगले (114), पपीता जालिंदर वाकडे (113), आशाबाई बाळासाहेब उगलमुगले (116).

# आवलगाव हमरापूर सरपंचपदी रामचंद्र मोरे यांची निवड

## मासेमारी करता करता बनले गावचे कारभारी..

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** तालुक्यातील आवलगाव हमरापुर ग्रुप ग्रामपंचायत निवडणूक चांगलीच रंगात आली होती एकीकडे सर्व मातब्बर मंडळी च्या विरोधात मासेमारी करणारे कुटुंब असा सामना रंगला होता यामध्ये मासेमारी करणारे रामचंद्र मोरे गावचे सरपंच पदी विराजमान झाले. राज्यात ग्रामपंचायत निवडणुका पार पडल्या यामध्ये वैजापूर तालुक्यातील आवलगाव हमरापुर या ग्रुप ग्राम पंचायतीची निवडणूक ही चांगलीच रंगत झाली हमरापुर येथील मोरे कुटुंब पारंपारिक मासेमारीचा व्यवसाय करतात या व्यवसायातूनच त्यांनी आपल्या कुटुंबाला उच्चशिक्षित केले रामचंद्र मोरे यांच्या मुलगा देशसेवेमध्ये कार्यरत आहे पुतणे एम बी बी एस डाक्टर आहे दुसरे पुतणे पी एस आय झालेले आहे मागील पांच वार्षिक निवडणुकीत मोरे यांच्या सुनबाई नंदाबाई संजय मोरे ग्रामपंचायतच्या सरपंच पदी विराजमान होत्या गावांमध्ये त्यांच्या माध्यमातून चांगले विकासकामे झाली यावर्षी जागा खुले असल्याने अनेक पाटलांनी या निवडणुकीत उडी घेतले होते मात्र मासेमारी करता करता गावची विकासाची नाळ मोरे कुटुंबाने धरली आहे त्यामुळेच पाटलाच्या विरोधात खुल्या जागेत रामचंद्र मोरे हे सरपंच पदासाठी निवडणुकीत उभे होते दोन्ही गावातील जनतेने त्यांना निवडून दिले आहे त्यामुळे तालुक्याबरोबरच जिल्ह्यात मासेमारी करणारा गावचा कारभारी बनल्याने चर्चेचा विषय बनला आहे.

# धर्माबाद तालुक्यातील बाबुळगाव, अटाळा ग्रा.पं.चा निकाल जाहीर, तर रोशनगाव बिनविरोध

## बाभुळगाव ग्रामपंचायतीवर काँग्रेसचा झेंडा

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील बाबुळगाव व अटाळा ग्रामपंचायतीचा निकाल मंगळवारी (ता.२०) जाहीर झाला असून यापूर्वीच रोषणगाव ग्रामपंचायत बनविरोध झाली आहे.बाबुळगाव ग्रामपंचायतीत काँग्रेसने तर रोषणगाव ग्रामपंचायत बीजेपीने बाजी मारली आहे. बाभुळगावातील सरपंचपद खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव होते.कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक बंडु पाटील मोरे यांची आई शांताबाई दत्तराम मोरे व मोरे ललिताबाई मारोती यांच्यात चुरसीची लढत झाली. यामध्ये मोरे शांताबाई दत्तराम यांनी बाजी मारली. शांताबाई मोरे यांना ३७९ तर ललिताबाई मोरे यांना ३०१ मते मिळाली. या निवडणुकीत सरपंच थेट जनतेतून निवडण्यात आला. सात पैकी तीन सदस्याची बिनविरोध निवड झाली होती. आता चार सदस्याची निवडणूक पार पडली. विजयी उमेदवार - शांताबाई दत्तराम मोरे (सरपंच), सदस्य- नागोराव संभाजी मुंडकर, शकुंतला अशोक मोरे, अनिता दत्ताहारी मोरे, हनुमंत मारुती मोरे हे विजयी झाले तर बिनविरोध विजयी उमेदवार-आशाताई विश्वनाथ इटकापल्ली, सुमनबाई बालाजी जुळणेकर, महादेव संभाजी भद्रे. आटाळा गावाचे सरपंचपद अनुसूचित जाती पुरुष प्रवर्गासाठी राखीव होते. नरेंद्र देविदास खंडागळे व दत्ता ग्यानु लांडगे यांच्यात सरळ लढत झाली असून यामध्ये नरेश खंडागळे यांनी २६६ मतांनी विजय मिळविला आहे.

**विजयी उमेदवार-**

नरेंद्र खंडागळे (सरपंच) ,सदस्य- सुरेश मारोतराव कदम,मारुती किशन लांडगे,लक्ष्मीबाई सुधाकर कदम, श्याम गंगाधर जाधव, बिनविरोध उमेदवार -कांताबाई चंद्रकांत मुपडे, प्रणिता मारुती चिखले, सुमनबाई बालासाहेब कदम, साईनाथ रामराव येवले यांची बिनविरोध निवड झाली.

# आ.शाह यांच्या नेतृत्वाने 34 कोटी निधीची तरतूद

## हिरे मेडिकल, तंत्रनिकेतन ग्रंथालय, न्यायाधीश निवासस्थान व मोठा पूल बांधण्यासाठी तरतूद

आधुनिक केसरी न्यूज

धुळे : नागपूर येथे चालू असलेल्या अधिवेशनात पुरवणी अर्थसंकल्पात धुळे शहर मतदार संघातील शासकीय तंत्रनिकेतन ग्रंथालय बांधणे, भा.हि.शा.वै. महाविद्यालय व रुग्णालय येथे नवीन इमारत बांधणे, मे. न्यायाधीश यांच्यासाठी निवासस्थान बांधणे आणि जीर्ण झालेल्या जुन्या मोठ्या पुलाच्या ठिकाणी नवीन मोठा पुल बांधणे या कामांसाठी सुमारे ३४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. धुळे शहरातील देवपूर व धुळे शहराला जोडणारा ब्रिटिशकालीन पुल मुदत पुर्ण झाल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नुकताच बंद करण्यात आला. ब्रिटिशांनी त्यांच्या सोईसाठी १८८९ साली पांझरा नदीवरील मोठ्यापुलाची निर्मिती केली. पुर्वी शहराबाहेरील वळण रस्ता नसल्याने मध्यप्रदेश,उत्तरप्रदेश व संपूर्ण उत्तर भारताला जोडणारी वाहतूक मोठ्यापुलावरून होत होती. धुळे शहराच्या विस्तारामुळे शहर आणि देवपूर यांच्यातील दळण वळण प्रामुख्याने ब्रिटिशकालीन मोठ्यापुलावरच आवलंबून होते.सुमारे १३३ वर्ष धुळेकरांच्या सेवेत असलेला मोठापुल मुदत संपल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग कडून इतर कुठलीही पर्यायी तजवीज नकरता बंद केल्यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.नागरिकांची गैरसोय लक्षात घेवून धुळे शहराचे आमदार फारुख शाह यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.रवींद्र चव्हाण यांची दि.१६ नोव्हेंबर २०२२ रोजी भेट घेवून वस्तुस्थिती लक्षात आणून दिली.आ.शाह यांच्या मागणीचे गांभीर्य ओळखून ना.रवींद्र चव्हाण यांनी तातडीने निधी उपलब्ध करून देणे चे आदेश संबंधितांना दिले. त्यानुसार हिवाळी अधिवेशनात पुरवणी अर्थसंकल्पात नवीन मोठ्या पुलासाठी ९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. धुळे शहरातील प्रथीतयश अशा शासकीय तंत्रनिकेतन या संस्थेला सुसज्ज ग्रंथालय आणि आवार भिंती बांधण्यासाठीच्या अंदाजपत्रकास शासनाची यापूर्वीच प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. हे काम मंजुर करण्यासाठी आमदार फारुख शाह यांनी विशेष प्रयत्न केले. शासनाने धुळे शहरातील शासकीय तंत्रनिकेतनसाठी सुसज्ज ग्रंथालय निर्माण करण्यासाठी पुरवणी अर्थसंकल्पात ११ कोटी ६४ लाख २९ हजार एवढ्या रक्कमेची पुरवणी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली



असून येत्या काळात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निविदा प्रक्रीया पार पाडून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाईल.
धुळे जिल्हा वकील संघाच्या कार्यक्रमात वकील संघांच्यावतीने धुळे जिल्हा कोर्टातील मा.न्यायाधीशांच्या निवास स्थाना बद्दल मागणी करण्यात आली होती. यापूर्वी मा.न्यायाधीशांना वेगवेगळ्या ठिकाणी सरकारी कॉर्टर मध्ये फार लहानश्या रूममध्ये रहावे लागत होते. त्यात पुरेशा सुखसुविधा नव्हत्या तसेच वेगवेगळ्या ठिकाणी जसे कल्याण भवनच्या बाजुला, जिल्हा परिषदच्या समोरील सरकारी अधिकाऱ्यांच्या कॉर्टर मध्ये रहावे लागत होते. काही न्यायाधीशांना तर रूम सुद्धा मिळत नव्हते. ही परिस्थिती बघुन आ.फारुख शाह यांनी सुमारे २ वर्षापूर्वी शासनाकडे न्यायाधीशांच्या निवासस्थानासाठी संपूर्ण प्रस्ताव तयार करून निधीची मागणी केली होती. ती आज रोजी शासनाकडून पुरवणी अर्थसंकल्प २०२२-२३ मध्ये ६ कोटी ९० लक्ष रुपये मा.न्यायाधीशांच्या निवासस्थानासाठी मंजुर करण्यात आले आहे. तसेच भा.हि.शा.वै.महाविद्यालय व रुग्णालय येथे नवीन इमारत बांधण्यासाठी ११.२५ कोटी रुपयाची देखील तरतूद करण्यात आलेली आहे. धुळे शहर मतदार संघातील शासकीय तंत्रनिकेतन ग्रंथालय, हिरे मेडीकल कॉलेज इमारत, न्यायाधीश निवासस्थान आणि नवीन मोठा पुल बांधणेसाठी सुमारे ३४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याने धुळे शहर मतदार संघात विकासाचे पर्व जोमात असणार आहे. याबाबत धुळेकर नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. पुरवणी अर्थसंकल्पात शहरासाठी ३४ कोटी रुपयांची तरतूद केल्यामुळे आ.फारुख शाह यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांचे आभार मानले आहे.

# बिलोलीत पत्रकारास मारहाण करणाऱ्यावर गुन्हा

## भ्याड हल्ल्यामुळे पत्रकार संघटना आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**ज्ञानेश्वर शिरगिरे**

**बिलोली :** पत्रकारावर हल्ला झाल्याचे बिलोली तालुक्यातील पत्रकारांना माहिती मिळतात संबंधित पत्रकारावर जातीवाचक शिवीगाळ करून हल्ला करणाऱ्या घटनेचा निषेध करीत पत्रकाराला मारहाण करणाऱ्या आरोपीवर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी बिलोली तालुका पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार प्रकाश पोवाडे, दादाराव इंगळे, राजू पाटील शिंदे, गंगाधर कुडके, वल्लीओद्दीन फारुकी, माधव एडके, यादव लोकडे, कमलाकर जमदाडे, शेख फारुख, संजय कुमार बिलोलीकर, सतीश बळवंतकर, गौतम लंके, साहेबराव दावलेकर, मुकिंदर कुडके, शेख इलियास, गौतम वाघमारे, संजय जाधव, धम्मपाल जाधव, सुनील कदम, गणपत धर्मपुरे आदी पत्रकारांनी बिलोली पोलीस ठाण्यात निवेदन दिले आहेत.
नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुका शहरालगत लागून एक विद्यानिकेतन मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह आहे. सदरील वस्तीगृहाची चौकशी करण्यासाठी ता.१६ डिसेंबर रोजी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नांदेडची समिती चौकशीसाठी आली असता त्या चौकशी अनुषंगाने वृत्तसंकलन करण्यासाठी गेलेल्या बिलोली तालुक्यातील बडुर येथील दैनिक पुण्यनगरीचे ग्रामीण पत्रकार भिमराव बडुरकर तेथे गेले असता, त्या वस्तीगृहाचे संचालकाने जातिवाचक शिवीगाळ करीत त्या पत्रकारास मारहाण केली आहे. पत्रकाराच्या फिर्यादीवरून बिलोली पोलीस ठाण्यात आरोपी सुनील बाबाराव एंबडवार यांच्या विरोधात अट्रोसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तरवर असे की, नांदेड जिल्ह्यातील बिलोली शहरालगत सावळी रोडवर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबाराव एंबडवार यांचे मागासवर्गीय मुलांचे विद्यानिकेतन नावाचे एक वसतिगृह आहे. सदरील वस्तीगृह बंद असल्या बाबतची संबंधित बातमी दि.१२ सप्टेंबर रोजी ग्रामीण पत्रकार भिमराव बडुरकर यांनी दै.पुण्यनगरी मध्ये प्रकाशीत केली होती. त्यामुळे तालुक्यातील व जिल्ह्यातील प्रस्थापित राजकीय पुढारी असलेले व जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबाराव एंबडवार यांचे सुपुत्र सुनिल बाबाराव एबडवार यांनी वस्तीगृह बंदची वृत्त प्रकाशित करणाऱ्या पत्रकारास गाठून तुम्ही आमच्या वस्तीगृहाच्या विरोधात बातमी का दिली, असा दम भरत तुमच्या बातमीने काहीच फरक पडत नाही, व संपूर्ण जिल्हा परिषदेची यंत्रणा हलविण्याची ताकद माझ्या वडिलांमध्ये आहे. असे दम देऊन निघून गेले होते. तदनंतर सदरील वस्तीगृहाचे प्रकरण राजकीय दबावामुळे दाबले जाईल म्हणून संबंधित पत्रकाराने वस्तीगृह बंद व अनागोंदी बाबतची स्वतः तक्रार जिल्हास्तरावर व विभागीय स्तरावर केली होती. त्या अनुषंगाने त्या तक्रारीची दखल घेत दि. १६ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता समाजकल्याण चौकशी समिती मार्फत सदरील वस्तीगृहाची चौकशी होत असल्याची माहिती संबंधित पत्रकाराला मिळाल्यानंतर संबंधित पत्रकार आपल्या काही सहकारी पत्रकारांना घेऊन वस्तीगृहाच्या ठिकाणी चौकशीची वृत्तसंकलन करण्यासाठी गेले असता, त्याठिकाणी वस्तीगृहाचा सचिव सुनिल बाबाराव एंबडवार हे देखील तेथे उपस्थित होते. त्यांनी संबंधित पत्रकारांला पाहताच तु इथे कशाला आलास म्हणून जातिवाचक शिवीगाळ करीत लाथा बुक्याने मारहाण करून सहकारी पत्रकारासमोरच अपमानित केले असल्याने संबंधित पत्रकाराने त्याच वेळी स्वतःचा जीव वाचवत बिलोली पोलीस स्टेशन गाठून दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी सुनील बाबाराव एंबडवार यांच्यावर बिलोली पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला . संबंधित प्रकरणाचा पुढील तपास बिलोली उपविभागीय पोलीस अधिकारी अर्चित चांडक हे करीत आहेत.

# गावगुंड तडवीवर विविध कलमाअन्वये गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील कोल्हे येथील पीडित महिलेच्या तक्रारिला अखेर यश कोल्हे येथील गाव गुंड सागर रशीद तडवी याच्या विरोधात पिंपळगाव हरेश्वर पोलीस ठान्यात विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल कलम ४५२.३२३.५०४.५०६. या कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. दि.२८.०९.२०२२ पीडित महिला बेबीबाई रमजान तडवी हे त्यांच्या राहत्या घरी रात्रिचे जेवण करत असताना आरोपी सागर तडवी याने पीडित महिलेच्या घरी जबरदस्ती प्रवेश करून पीडित महिला व तिच्या पतीला बेदम मारहान केलेली होती व सार्वजनिक गल्ली मध्ये उभा राहून स्त्री जातीला लाजवेल या स्वरुपाची शिवी गाळ केलेली होती त्यावरून पीडित महिलेने दि.३०.०९.२०२२ रोजी पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशनला हजर होऊन लेखी तक्रार दिलेली होती मात्र स्थानिक पोलिस कर्मच्यारी यांनी आरोपीला वाचवाण्याचे काम केल्याने पीडित महिलेने आपल्याला न्याय मिळावा म्हणून स्थानिक पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरिक्षक महेन्द्र वाघमारे, जिल्हाधिकारी जळगाव , पोलीस अधीक्षक कार्यालय जळगाव, राज्य महिला आयोग रुपालीताई चाकणकर, मानवाअधिकार आयोग, यांच्या कडे केलेल्या तक्रारी नंतर पीडित महिलेच्या तक्रारिची दखल घेऊन कलम ४५२.३२३.५०४.५०६ नुसार सदर आरोपी सागर रशीद तडवी याच्या विरोधात पिंपळगाव हरेश्वर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झालेला असून संबंधित प्रकरणमध्ये सहाय्यक पोलीस निरिक्षक महेंद्र वाघमारे यांचे कौतुक होत आहे.

# कुंभारी येथे खंडापूरकर बाबा यांच्याकडून राज्यस्तरीय शिबिर स्थळाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील कुंभारीण येथे दिनांक ,19/12/२०२२.सोमवार रोजी अजिंठा येथे तसेच कुंभारी येथे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री प्रदीप बाबा पाटील खंडापूरकर हे आले असता त्यांचे स्वागत अरुण चव्हाण देशमुख प्रदेशाध्यक्ष अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य व सोयगाव तालुका अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी केले व नंतर प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांनी राज्यस्तरीय शिबिर स्थळ पाहणी केली व यात बाबांनी प्रामुख्याने महिलांसाठी निवासस्थान संडास बाथरूम महिलांची होणारे सोय या गोष्टी अतिशय बारकाईने बघितल्या म्हणजेच आज बाबा किती आपल्या मुलींसाठी काळजी घेतात ते संघटनेतील महिला पदाधिकारी यांना कार्यकर्ता किंवा पदाधिकारी म्हणून नाही बघत माझी आई माझी बहीण माझी मुलगी या उद्देशाने त्यांचा विचार करतात हे खूप उल्लेखनीय आणि बाबा विषय जेवढं बोलावं तेवढं कमी आहे तसेच पुरुष मंडळीसाठी सुद्धा



बाबांनी थंडीचे दिवस आहेत गरम पाणी झोपण्याची व्यवस्था खाण्यापिण्याची व्यवस्था या सगळ्या गोष्टीचा बारकाईने विचार करून आणि पाहणी करून स्वतः निर्णय घेतला दिवसभर उपाशी राहून संघटनेच्या मुला मुलींना एक जीवापाड प्रेम देणारे असा अवलिया पुन्हा ना होणे हे लक्षात घ्या असो आज माझ्या डोळ्यातून पाणी आले कारण की बाबांनी स्वतःच्या जीवाकडे तब्येतीकडे किंवा गोळी औषधे कधीच बघितली नाही स्वतःचा विचार केला नाही फक्त संघटना आणि संघटना आणि संघटनेतील महिला पुरुष पदाधिकारी कार्यकर्ता हे माझे देव दैवत आहे हे आज बाबांनी प्रत्यक्षात दाखवून दिले खरोखर बाबांना मानावे लागेल चला मला तर आज बाबांसोबत बरेच तास वेळ घालण्याचा आणि काम करण्याचा योग आला मी स्वतःला भाग्यवान समजतो यावेळी उपस्थित अरुण चव्हाण देशमुख प्रदेशाध्यक्ष,प्रभाकर साळवे प्रदेश सरचिटणीस,इकबाल कासम तडवी बागुल जिल्हाध्यक्ष आदिवासी विभाग औरंगाबाद, श्री गोकुळ सिंग राजपूत तालुकाध्यक्ष सोयगाव,शेख अझहर तालुका सचिव सोयगाव, माधव भाऊ साळवे कुंभारी, येथील सरपंच गावातील सर्व पदाधिकारी तसेच संघटनेतील संघटनेचे सर्व महिला पुरुष पदाधिकारी इत्यादी उपस्थित होते. यावेळी बाबांनी काटेकोरपणे राज्यस्तरीय शिबिर स्थळाचे अगदी बारीक ईने निरीक्षण करून प्रदेशाध्यक्ष श्री अरुण चव्हाण देशमुख यांना काही शिबिरा विषयी सूचना करण्यात आल्या आहेत.



# फर्दापुरात शौचालयाचे पाणी रस्त्यावर

## प्रभागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापुर येथील ग्रामपंचायतीच्या प्रभाग 3 मध्ये सराई कडे व गावांमध्ये जाणाऱ्या या रस्त्यावर सतत मोठ्या प्रमाणात ये जा करणाऱ्या टू व्हीलर व नागरिकांची वर्दळ असते त्या रस्त्यावर काही लोकांच्या जाणून बुजून दुर्लक्षपणामुळे त्यांच्या शौचालयाचे, दुषित सांडपाणी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहत असून या रस्त्यावर पावसाळ्यात ज्या प्रकारे चिखलाचे स्वरूप पाहावयास मिळते तेच चित्र आज रोजी बघावयास मिळत आहे. मात्र ज्या ज्या नागरिकांच्या घरातील शौचालय, मुतारीचे सांडपाणी वाहून रस्त्यावर येत आहे त्या प्रभाग क्र तीन मधील आजू बाजूच्या नागरिकांचे शौचालयाचे सांडपाणी मुख्य रस्त्यावर वाहत असून त्या वाहणाऱ्या सांडपाण्या मुळे मोठ्या प्रमाणात चिखल होत आहे. ये जा करणाऱ्या टू व्हीलर स्लिप होऊन छोटे मोठे अपघात होत आहे. गेल्या आठवड्यात अत्यन्त गरीब कुटुंबातील एक महिला जी मोळी विकून आपला उदरनिर्वाह करते ती महिला गाडी स्लिप होऊन गाडी पडली असून तिला जबर मार लागला असून आज रोजी ती महिला औरंगाबाद येथे हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहे.गुरुवारी आठवडी बाजारातुन एक महिला बाजार घेऊन येत असताना पडली या सर्व प्रकारची माहिती प्रभाग क्र 3 मधील नागरिकांनी ग्रामपंचायत मधील सरपंच, सदस्य यांना निदर्शनास आणून दिली असता त्यांनी पाहणी केली मात्र उपाय काढू शकले नाही.

शाळेतील लहान लहान मुलांना, वयोवृद्ध नागरिकांना या रस्त्यावरुन चालताना जीव मुठीत घेऊन तारेवरची कसरत करावी लागत आहे. याच रस्त्यावर काही अंतरावर दर्गा आहे व दक्षिणेस मुस्लिम बांधव यांची मज्जीत आहे. मुस्लिम बांधव दिवसातुन ५,६ वेळा नमाज पठण करण्यासाठी येतात त्यांच्या अंगावर ते सांडपाण्याचे शिंतोडे उडतात. ग्रामपंचायतला हे दिसत नाही का? शासनाचा लाखो रुपयांचा निधी येतो मात्र खर्च होतांना दिसत नाही ग्रामपंचायत लोकप्रतिनिधी सदस्य या समस्येवर उपाय योजना काढत नसेल तर खूप मोठी शोकांतिका आहे. असेच म्हणावे लागेल तेच वाहणारे सांडपाणी पुढे एका किराणा दुकाना समोर साचले असून गटारी तुडुंब भरली आहे. त्या ठिकाणी डुकरे बसतात त्यामुळे मोठ्या प्रमाणात डासांचे प्रमाण वाढले असून काही नागरिक,लहान लहान मुले सुद्धा आजारी पडले आहेत. डेंगू सारखा आजार सुद्धा होऊ शकतो.प्रभाग क्र तीन मधील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून याला बेजबाबदार ग्रामपंचायत आहे . ज्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे त्या नागरिकांनी सांडपाणी वाहून येणाऱ्या लोकांना समज दिली की तुमचे शौचालय, मुतारी सांडपाणीचा तुम्ही बंदोबस्त करावा तुमच्या पाण्याची वाहणारी दिशा रस्त्यावर नाही किंवा तुम्ही तुमच्या घराजवळ शोषखड्डा खोदून बंदोबस्त करावा. तेव्हा त्यानीं त्या नागरिकांना असे उत्तर दिले की आमचेच तुम्हाला सांडपाणी दिसते का ? या गंभीर समस्ये बद्दल गावातील सरपंच,तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामसेवक, व प्रभाग क्रमांक तीन मधील ग्रामपंचायत सदस्य यांना सांगून सुद्धा काहीच फायदा झाला नाही. शेवटी त्या भागातील नागरिकांनी धाव घेत आपली समस्या पत्रकार प्रविण तायडे यांच्या कडे मांडली असता त्यानीं ताबडतोब ग्रामसेवक सुनील मंगरुळे,यांच्याशी संपर्क साधून चर्चा केली. व माजी ग्रा.प.सदस्य भीमा बोराडे यांना समक्ष ज्या रस्त्यावर शौचालयचे सांडपाणी वाहत होते त्या ठिकाणी बोलवून निदर्शनास आणून दिले की ज्या ज्या नागरिकांचे शौचालय, मुतारीचे सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे त्यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून याला बेजबाबदार ग्रामपंचायत,असेल त्यानीं रस्त्यावर वाहणाऱ्या या सांडपाणी चा शोषखड्डा खोदून 2 दिवसात बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिक करत आहेत अन्यथा नागरिक पंचायत समिती सोयगाव गटविकास अधिकारी यांना लेखी तक्रार निवेदन देण्यात येईल असा इशारा दिला असून ग्रामपंचायत ला ठिय्या आंदोलन करणार आहे याची लवकरात लवकर दखल घेण्यात यावी नागरिकांनी मागणी केली आहे.



> फर्दापुर ग्रामपंचायतच्या प्रभाग क्रमांक तीन मधील ज्या ज्या लोकांच्या शौचालयाचे घाण पाणी रस्त्यावर येत असून त्या घाण पाण्यामुळे नागरिकाचे आरोग्य धोक्यात येत असल्यामुळे त्या शौचालयाचे घाण पाणी रस्त्यावर सोडणाऱ्या लोकांना ग्रामपंचायतीच्या वतीने कायदेशीर नोटीस देऊन सदरील रस्त्यावर त्यांच्या शौचालयाचे दूषित सांडपाणी बंद करावे असे कळवले जर त्यांनी ऐकलेच नाही तर त्यांच्याविरुद्ध ग्रामपंचायत वतीने कडक कारवाई करण्यात येईल
> **– सुनिल मंगरुळे, ग्राम विकास अधिकारी**
> **ग्रामपंचायत कार्यालय फर्दापुर**

# सचिवपदी प्राचार्य केंद्रे

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** अखिल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त मंडळाच्या राज्य सचिवपदी प्राचार्य मोतीभाऊ केंद्रे यांची निवड झाली आहे. महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत नव्या राज्य कार्यकारीणीची निवड करण्यात आली असुन मराठवाड्याला पहिल्यांदाच या संस्थेच्या सचिवपदाची जबाबदारी मिळाली आहे.

महाराष्ट्रात माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचे संयुक्त महामंडळ राज्यभर प्रभावीपणे शिक्षण क्षेत्रात काम करत आहे. महामंडळाचे संस्थापक रावसाहेब आवारे आणि राज्य अध्यक्ष मारोती खेडेकर यांच्या उपस्थितीत नुकतीच नवीन कार्यकारीणी निवडण्यात आली. यात अध्यक्षपदी पुण्याचे के.एस. ढोमसे तर सचिवपदी नांदेड जिल्ह्यातील शेकापूर (ता. कंधार) येथील महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मोतीभाऊ केंद्रे यांची एकमताने निवड झाली. मुख्याध्यापक संघाच्या माध्यमातून नांदेड विभागात मोतीभाऊ केंद्रे हे सर्व परिचित असुन मुख्याध्यापकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आग्रही भूमिका मांडतात. शिक्षण क्षेत्रात ते विविध पदावर कार्यरत असुन त्यांच्याकडे आता महामंडळाच्या सचिव पदाचीही जबाबदारी आली आहे. राज्य कार्यकारीणीत औरंगाबादचे मोहनराव सोनवणे तर भंडारा येथील अशोक पारधी कार्याध्यक्षपदी निवडले आहेत. उपाध्यक्ष पदी नंदकुमार बारवकर (पुणे) तर शत्रुघ्न बिरकड (अकोला), प्रकाश देशमुख (लातूर) यांच्यासह विलास भारसाखळे, देवीदास उमटे, मनोहर पवार, दिलीप पाटील, प्रविण दवे, गोविंद फुलवाळे, एस.बी.देशमुख, सतीश जगताप, प्रमोद नेमाडे, सज्जन पाटील, भागचंद औताडे, नरेशचंद्र वाळके, हनुमंत साखरे, दत्ताजी कदम, ममता गवळी, वसंत पाटील यांची विविध पदावर निवड झाली आहे.



# एक धाव भारतीय सैनिकांसाठी उपक्रमात महिलांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथे एक धाव भारतीय सैनिकांना सलाम या निर्मळ हेतूने पैठण येथील फिटीस्तान ग्रुप तर्फे ५ किलोमीटरचा मॅरेथॉन रन लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांसाठी संत ज्ञानेश्वर उद्यान येथे आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी पैठण शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. रिया पांजवानी, डॉ. शीतल चेमटे, मेघना सराफ, शितल लोळगे, स्वाती पाटील आदींनी सहभाग नोंदवला.

# मुंबईकर उकाड्याने हैराण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईतील तापमानातील बदलांमुळे लोकांच्या आरोग्याच्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे. अनेकांना सर्दी, खोकला, अंग दुखीसारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हिवाळ्यात मुंबईत सलग तीन दिवस कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या वर बघायला मिळत आहे. उकाड्यामुळे मुंबईकर हैराण झाले आहेत.

मुंबईतील अनेक रुग्णालयांमध्ये अशीच गर्दी बघायला मिळते आहे. कारण आहे ऐन हिवाळ्यात गायब झालेली थंडी. थंडीच्या महिन्यातही मुंबईचा पारा ३६ अंशांपर्यंत पोहोचलाय. त्यामुळे अनेकांचे स्वेटर्स आणि शॉल अजूनही धूळखात तर पडल्याच आहेत. मात्र, सोबतच सर्दी, खोकला आणि अंगदुखीसारख्या त्रासाला सामोरे जावे लागते आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता काही दिवसांपूर्वी ३०० पार बघायला मिळाली होती. अशात अनेकांना सर्दी, खोकल्याच्या त्रासाला सामोरे जावे लागले होते. मात्र, हिवाळ्यातही तापमान ३५अंशापार असल्यानं तीच परिस्थिती बघायला मिळते आहे. मुंबईतील पारा मागील तीन दिवसांपासून ३५ अंश सेल्सिअस पार बघायला मिळतोय.

# टाकळी खुर्द येथे निवडणूक निकालानंतर दगडफेकीत भाजपा कार्यकर्त्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील टाकळी खुर्द येथे या गावात ग्रामपंचायत निवडणुकीच्या निकालानंतर विजय व पराभवाचे चित्र पहावयास मिळत आहे. परंतु, जामनेर तालुक्यातील टाकळी येथे ग्रामपंचायत निवडणुकीच्या निकालानंतर दोन गट आपसात भिडले. दरम्यान दगडफेक देखील झाली असून यात भाजप कार्यकर्त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. जामनेर तालुक्यातील ग्रामपंचायतींवरदेखील भाजपचे वर्चस्व राहिले आहे. या दरम्यान जामनेर तालुक्यातील टाकळी खुर्द येथील ग्रामपंचायत निवडणूक निकालानंतर विजयी झालेल्या उमेदवारांनी गावात प्रवेश केल्या- केल्याच त्यांच्यावर पराभुत झालेल्या विरोधकांकडून तुफान दगडफेक करण्यात आली. पोलिसांनी संशयीतांची धरपकड करून सुमारे २०-२५ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. गावामधे पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.टाकळी ग्रामपचायतीच्या निकालानंतर दोन गट भिडले असून काही जणांनी दगडफेक केली. यामुळे गावात दंगलीसारखी परिस्थिती निर्माण झाली होती. या दगडफेकीत गंभीर जखमी झालेल्या धनराज श्रीराम माळी (वय ३२) या भाजप कार्यकर्त्याचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. घटनेनंतर जामनेरच्या उपजिल्हा रुग्णालयात नातेवाईकांची गर्दी व प्रचंड आक्रोश केला.



काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in